# Bhausaheb Lahane Dnanprakash Arts College, Pijar

**Report**

**on**

**"Motipuspa" (Annual College Magazine )**

Our college aims at bringing rural students to the mainstream flow, through higher education. According to this resolution, we are organizing many activities to develop the personality of the students. Our stand is that students should be the pillar of the country, make them good citizens.

It is the observation of our Marathi department that some students have many latent qualities while teaching at this degree level. In fact, we found in some students the creative mind, as well as the creative mind of a good, quality scholarly writer. These students have the ability to write good poetry and perform it. No, the students make accurate turns of these contemporaries. Some students like to write biographies of their former great personalities. They also have the ability to write witty, witty articles. In this regard, the Principal of the College, Dr. V. C. Kharode came up with an innovative idea. We aim to give a platform to the talent of our college students. At the end of the year, it was decided to publish the annual issue of the college.

For seventeen years, our college has been publishing an annual issue showcasing the talent of the students of the college under the Education Broadcasting Board. Seventeen years ago, this annual issue was named 'Motipushpa'. Even today, this magazine (annual issue) is published under the same name. Cultural, social and national activities organized in the college every year are taken into consideration in this issue. A collection of poems, writings, thoughts written by college students is a feature of all these issues.

This activity is an important from the point of development of students' skill which acts as the backbone of higher education. The teachers of various subjects are also giving articles on the institution in this annual issue. Apart from this, agriculture of News centers, Annual planning, work plan, number of admission of caste-wise students, annual aswar of national service scheme etc.

The internalization of elements may help to increase the quality of personnel numbers. Usually from mid-semester onwards. The content materials are invited from admitted students. In the first fortnight of March, the articles of teachers are collected along with the department. Marathi-English and a student feedback editorial board of the college is functioning. The composition of the principal's notes and editorials is revised every year. Then the Marathi department checks all the collected materials according to the rules of spelling. After the printing search, the numbering printing work takes place in the month of April. The final stage comes after four-five checks to see if all the text is flawless before printing. Photographs of the activities of various departments to be completed in the college and the cover of the issue are prepared. The contribution of

Marathi department is huge while carrying out all these processes. After that finally, in the month of June, four hundred copies of this subsequent (Kramik) issues are printed.

A sample copy of the annual issue of 'Motipushpa' is prepared. This copy is checked and the defects are removed. Finally the index is created. Founder President of Sushikshan Prasarak Mandal. The 45th annual issue will be unveiled on June 22, Bhausaheb Lahane's anniversary, with the auspicious hands of dignitaries. A document of all the events up to Satraarako with contemporary and literary value is oriented towards the society in the annual Ankara page 'Motipushpa'.

Five reports of five years (motipushpa) are given below in brief.

**Motipuspa (Annual Issue ) Session: 2018-19**

The feelings of the youth have been expressed through poems. Apart from this, the contemporary thinking of great men has been presented by the students through various articles. Many scholarly articles by professors are the glory of this issue. In this session, the college celebrated law awareness workshops, tree planting ceremony, constitution awareness week, new voter registration activities, rescue competition, blood group and hemoglobin testing camp, construction of dam in adoption village, dissemination of solar energy, organization of e-commerce workshop. Department of Economics visited the Agriculture Exhibition of Panjabrao Deshmukh' Krishi University, Akola along with the students. This is a unique initiative was decided to be presented in "Snapshots" of all the above activities add to the originality of the issue.

Motipuspa Varshikank : **Session 2013-2014, 2020-21**

In two years

**Session 2019-200** before the end of this year. The crisis of corona epidemic had collapsed. Lockdowns everywhere and preventive measures recommended by the World Health Organization caused a wave of measles to spread around the world. This had a very negative impact on the education sector. Therefore, the college released the joint yearbook for two years. How many cheap students have passed the higher education exams conducted through distance system in this chaotic situation. Articles expressing this fearful state of society appeared in this issue after the restrictions on poetry were relaxed. Madan Shayli for Ekavali books, workshop for youth information etc., organization of book exhibition, gift given by Arthashastra Mandal to industry exhibition, financial assistance to needy Trias, teaching ancient yoga to overcome the Corona crisis etc. Students were involved in implementing the activities. The graduation ceremony, which was held after the corona restrictions were lifted, was held in Mahadia auditorium.

**Motipuspa (College Magazine) - 2021-22**

The Session-2021-22 is a very important year for us. Completing the celebration of the birth centenary of Rup Bhausaheb, the founder president of the Samsan Prasarak Mandal in the year 2022, Mere College conducted various activities on the occasion of the centenary year in the year 2021-22. The result of this is that we call upon various dignitaries throughout the year to verbalize their memorable moments. Therefore, ten excellent articles that challenge the thought and work of Kha-Bhausaheb Unhane have been included in this annual issue. The political efforts of Bhausaheb (Shavinane Sukhar Moments) can be seen in this issue. In addition, this issue also contains photos of activities that show the participation of various departments of the college, such as Khelo India Competition, Women's Day Lectures, Establishment of Sama Shaphana Kendra, Retired Shiksha

Thekela Satkar, Book Exhibition organized for Rangana Dhan Jayanti, Speech Competition organized on Constitution Day, R.S.Y.O. They have built embankment 30. The special feature of this issue is the section describing the murders of young men and women who are studying in Mahavihala, the articles, and the professors' own mock articles.

**Motipuspa: 2022-23**

In the session-2022-23 the annual issue of Maha 'Motipushpa' was presented by our Madhyavidyala Principal Dr. V. C. Kharode, released under the title 'Internal Quality Assurance Special Issue 45' from Kharode's innovative ideas. In the last five years, various activities have been implemented by each department of the school, the learning skills of the teachers, how they relate to the society, cultural activities, the work of the national service scheme, we have presented self-study from various elements. Various subjects including the Principal of the College, scholarly articles, ex-students' pubic life, Poems, articles, thoughts of students are included in the collection. College strategic planning, action plan, various materials artifacts, cooking and cone competition held in the college, R.S. Diagnosing camp, motivational program, elocution competition, spelling workshop, participation in Corona specially 07 camp, voter awareness rally, bandharan production saree activities are recorded in this issue with photos.

A special feature of this issue is the distribution of social responsibility funds of the college to the needy.

Bhausaheb Lahane Dnyanprakash Art's College, Pinjar, Ta. Barshitakli, Dist. Akola

Principal,
Bhausaheb Lahane
Dnyanprakash Arts College,
PINJAR, Dist.Akola

सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर,ता.बार्शिटाकळी जि.अकोला.

द्वारा संचालित

नॅक,बंगलोर द्वारा थर्ड सायकल मानांकित महाविद्यालय,श्रेणी 'बी'

वार्षिकांक

# मोतीपुष्प















## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज

पिंजर ता.बार्शिटाकळी जि.अकोला.

2019-2020

2020-2021



शिवजयंती साजरी करताना मा.प्राचार्य व्ही.सी.खरोडे व रासेयो प्रमुख प्रा.आर.एन.गावंडे तथा प्राध्यापक वृंद -कर्मचारी



रासेयो द्वारा आयोजित राष्ट्रीय एकात्मता वक्तृत्व स्पर्धा समारोपीय भाषण करतांना प्राचार्य डॉ.व्ही.सी.खरो



सांगली,कोल्हापूर पुरग्रस्तांना महाविद्यालयातर्फे मदत निधी संकलन



राष्ट्रीय एकात्मता वक्तृत्व स्पर्धेत सुत्रसंचालन : कु.सायिका



युवा माहिती दूत कार्यशाळेची माहिती देताना श्री राजु मवाईकर (समन्वयक)



विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करतांना प्राचार्य तथा पोलीस अधिकारी




ऑनलाईन प्रणालीद्वारे संविधान दिन साजरा करतांना प्राचार्य



विद्यालयाचा प्राध्यापक वृंद

## संपादकीय

आमच्या महाविद्यालयाचा ''मोतीपुष्प '' हा वार्षिकांक आपल्या हाती सोपवितांना मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयात कला शाखेतून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या तरुण हृदयांची स्पंदने, त्यांचे विचार व भावना यांना मोळकेपणाने व्यक्त व्हावे असे हे व्यासपीठ म्हणजे आमच्या महाविद्यालयाचा हा वार्षिक अंक होय. सत्र २०२०-२०२१ मध्ये कोरोना चा जास्त प्रमाणावर प्रार्दुभाव असल्यामुळे , विद्यार्थ्यांचा वार्षिकांकात सहभाग होऊ शकले नाही. त्यामुळे दोन्ही अंक सत्र २०१९-२० व २०२०-२१ चे एकत्रीपणे संकलीत करीत आहोत.

साहित्याची निर्मिती प्रक्रिया ही जटील असते. युवा अवस्थेत विद्यार्थ्यांना कवितेतून व्यक्त होणे सोपे वाटते. परिणामी या अंकात कवितांची संख्या अधिक दिसेल. कवितांसोबतच हे विद्यार्थी थोर पुरुषांचे नव्याने चिंतन करुन आपल्या लेखांमधून मांडतांना दिसतात. आई-वडिलांचे ऋण,शेतकऱ्यांची अवस्था,मैत्री, नातेसंबंध अशा विविध विषयांवर व्यक्त होणारी ही तरुणपिढी आहे. विद्यार्थ्यांसोबतच आमच्या महाविद्यालयातील संशोधक वृत्तीच्या प्राध्यापकांनी विविध विषयांवर आपले चिंतन मांडले आहे. असा हा सर्वांगसुंदर वार्षिकांक आपण जरुर वाचावा ही विनंती.

### संपादक मंडळ

प्रा.डॉ.ए.व्ही.वाहुरवाघ
प्रा.डॉ.एम.के.फडणीस
प्रा.आर.एन.गावंडे
कु.कोमल अंभोरे (बी.ए.भाग -२)
राहुल सावंत (बी.ए.भाग-२)
रोशन जाधव (बी.ए.भाग -१ )

प्रकाशक : सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर
ता.बार्शिटाकळी,जि.अकोला.

मुद्रक : आदर्श ग्राफीक्स
जठारपेठ,अकोला. मो. ९८८१८५१३४१

" विद्या परम दैवतम् "

' मोतीपुष्प ' या वार्षिक अंकातील सर्व विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| अ..क्र. | लेख | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १) | प्राचार्यांचे मनोगत | | १ |
| २) | ग्रंथालय आणि वर्तमान पत्र | डॉ.रेखा सुखदेव काळबांडे | ३ |
| ३) | ग्रंथालयाचा अहवाल | | ५ |
| ४) | मराठी भाषा नष्ट होईल ही भीती अनाठायी | प्रा.डॉ.अशोक व्ही.वाहुरवाघ | ६ |
| ५) | कोरोना–आर्थिक सामाजिक परिणाम | डॉ.पंकज एम. तायडे | ८ |
| ६) | निर्वासित कामगार व शेतमजुरासंबंधी डॉ आंबेडकरांची भुमिका | डॉ.वासुदेव वा.भगत | १२ |
| ७) | आसनांचा खेळाडुंच्या पायाच्या कार्यक्षमतेवर होणाऱ्या परिणामांचे चिकित्सक अध्ययन | डॉ.नानासाहेब भा. सपकाळ | १६ |
| ८) | छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ | प्रा.सुनील एम.मनवर | १९ |
| ९) | Importance of Yoga and Pranayam | प्रा.रामकृष्ण एन.गावंडे | २० |
| १०) | आदिवासी जमातीची उत्पत्ती | डॉ.अनिल के.ठाकरे | २१ |
| ११) | अक्षर धन | श्री भाऊराव महल्ले | २३ |
| ११) | मेरा एन.एस.एस.का सफर | कु.रोशनी संजय जयस्वाल | २४ |
| १२) | महाराष्ट्राचे राष्ट्र विकासात योगदान | दत्ता हनुमान सदाफळे | २५ |
| १३) | विसरत चालेला बाप | कु.भाग्यश्री बा.मुळे | २६ |
| १४ | बेटी की पुकार | कु.तेजस्विनी हातोलकर | २७ |
| १४) | न्याय मिळालाच पाहिजे | कु.रोहिणी नयन वाघमारे | २८ |
| १५) | बेटी बचाओ बेटी पढाओ ! | कु.मोनाली विनोद भेराने | ३० |
| १६) | खरी सरस्वती सावित्री | कु.दामिनी मुळे | ३० |
| १७) | स्त्री शिवाय माणूस अपूर्णच | कु. मेधा घाडगे | ३१ |
| १८) | भुकेची आग | कु. आकांक्षा इंगळे | ३१ |




# अनुक्रमणिका


| अ..क्र. | लेख | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १९) | युवकांचे आदर्श छत्रपती शिवाजी | राहुल सावंत | ३२ |
| २०) | शेतकऱ्याची व्यथा | कु.दिव्या गणेश राऊत | ३४ |
| २१) | शिक्षक म्हणजे कोण | कु.कोमल अंभोरे | ३५ |
| २२) | शेतकऱ्यांचे हाल | कु.दिपाली शिवहरी घाटोळकर | ३६ |
| २४) | माता-पिता आणि जीवन | कु.प्रगती सोनोने | ३७ |
| २५) | मुलींनी जगावे तरी कसे ? | कु.पुजा रामेश्वर काकड | ३८ |
| २६) | आई-वडील ,शिवाजी पोवाडा | कु. पोर्णिमा सत्यविजय हागे | ३९ |
| २८) | आई | कु. हर्षा दादाराव सदांशिव | ४१ |
| २९) | मातृभूमिची शान | कु.शारदा नामदेव आसरे | ४२ |
| ३०) | स्त्रीजन्म म्हणोनी न व्हावे उदास | कु.पायल रामेश्वर राठोड | ४३ |
| ३१) | आयुष्यातील वळण | शिवा थाटे | ४४ |
| ३२) | जाती निहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या | | ४५ |
| ३३) | पदवीदान समारंभ अहवाल | | ४६ |
| ३४) | वार्षिक नियोजन व कृती आराखडा | | ४७ |
| ३५) | विविध समित्यांचा कार्यभार | | ५३ |
| ३६) | सामुदायिक प्रार्थना प्रार्थनाष्टक | | ५५ |
| ३७) | खरा तो एकची धर्म | | ५६ |


## " विद्या परम दैवतम् "

**विद्या विना मती गेली । मती विना निती गेली ।।**
**निती विना गती गेली । गती विना वित्त गेले ।।**
**एवढे अनर्थ एका अविद्येने केले ।।**



# मेरा एन.एस.एस.का सफर .....

**N.S.S.**में शामिल होणे एक ही उद्देश मन में था कि जब एक विषय गॉप रह जायेगा। ता`एन.एस. एस. के पाच मार्ककम हो जायेगे बस यही एक उद्देश से मैं एन.एस.एस. में शामिल हुई थी । जब सही मायने में कॉलेज मे एन.एस.एस. के कार्यक्रम शुरु हो ये जैसे की गांव में से रॅली निकालना, गाव साफ करना कॉलेज में कार्यक्रम लेना उस में से सामने आना कभी सुत्रसंचालन करना, कभी आभार प्रदर्शन करना, कभी प्रास्तविक करना तो कमी भाषण भी देना और हो सभा करते -करते खुद में एक अलगही सेल्फ-कॉन्फीडरन्स निर्माण होना और जब कार्यकम खतम हो जाये तो फिर ' फडणीस सर ' देते, केले और बिस्कीट का नाश्ता बढे मजेसे करते.

और जब जनवरी महिना आते ही कॅम्प में जाने कि तयारी में लगना ना और कॅम्प में जाने के लिये '' ॲडमिशन्स '' लिया उस दिन से हि कॅम्प में जाने के लिये परमिशन लेते रहना और जब कॅम्प में जाना सुबह उठ कर ५ बजे योगा करना बाद में गांव साफ करना फिर नाश्ता करना और फिर बंधारा बनाने को जाना बंधारा बनाते समय,पोते भरणा,पोते सिना, खोदना या सब करते समय सेल्फी निकालना ओर लडको से दाट भी खाना ,काम करना '' फोटो नंतर काढा '', बडी माजा आती थी । और हमारे दो,'' कोल्ड वॉर '' रागु नका ,कोणाला, और ' राग आला ' कुछ भी हुआ तो हम यह शब्द वापरते थे । कॅम्प में चहा नही मिलता है ना तो फिर सर और मॅडम के नजर चुकी ' वेशु के गर, पर चहा पिने लिये बढे शान से जान क्यु कॅम्प में सिर्फ मुझे ओर प्रतिक्षा को नही चहा मिला करती पडे थी और सब के साथ बैठकर खाना खाना ओर जब कॅम्प मे गावावाले लोगों के लिए नेत्रतपासणी का कॅम्प या उस दिन तो सभी गावावाले से मिळने का मौका मिला और उनसे जान पहचान बडी और आज भी जब गाव के लोग मिलते है तो बडे ही चार से बाढ करते है ।

यह कॅम्प के ७ दिन में जो सिकने मिला वह राम दही ही दुनिया के को भी युनिव्हलर्स में मिले गा.ओर जो काम घर पर कभी नही किया वह काम यह कॅम्प में बढे शासन से किया, और रोज बौध्दिक सच के द्वारान रोज कुछ नया सिखने को मिला और कुछ नया करने की उमीद एक नया कॉनफिक्डेन्स ' साबु मॅडम , से मिलकर मिला और जब एन.एस.एस. के कॅम्प का आखरी दिन था तब लगा काश एन.एस.एस. का कॅम्प १० दिनों का होता तो ओर किचना नया सिखने मिलता.

ओर फिर आगे एन.एस.एस. के थी ही मुझे अमरावती में हुये '' महिला सक्षमीकरण '' के दोन दिन के कार्यशाला में जाने का मौका मिला और उसे में नऊ व्याख्यान हुये उसमें मुझे सबसे ज्यादा चौंळींरींश करने वाला व्याख्यान ' गणेशवाला मॅडम ' का लगा और ' मिरा कांबळे और गणेडीवाल मॅडम से मुझे यह ध्यान में आय की परिस्थिती कैसी भी हो उसमे से रास्ता निकल ही जाता है ' तुम कहा पर उसे ज्यादा यह बात खाँींरिपीं है तुम कैसे पढे, ओर एक नई बात समझ आई की शादी के बात भी करीयर बन सकता है । यह सब मुझे गणेडीवाल मॅडम से मिलने के बाद समझ आया जब की में समझती दिदी की शादी के बाद ही जिंदगी है । एस.एस.एस. में तीन साल पुरे करने के बाद ध्यान में आया एन.एस.एस. सिर्फ ५-६ मार्क गॅप रहे विषय निकालने से ज्यादा पुरे जिंदगी के लिए एक सिख मिलती है । एक ऊेषळवरपलश मिलता है । कुछ कर दिखाने कि उमीद जगती है ।

कु.रोशनी संजय जयस्वाल
बी.ए. भाग -३

# बेटी की पुकार



बेटी ये कोख से बोल रही
माँ करदे तू मुझ पे उपकार
मत मार मुझे जीवन दे दे
मुझ को भी देखने दे संसार

बिन मेरे माँ तूम भैय्या को
राखी किससे बंधताओगी
मरती रही कोख की हर बेटी
तो बहु कँहा से लाओगे
बेटी ही बहन बेटी दुल्हन बेटी से
होता परिपार
मत मार मुझे जीवन देदे
मुझ को भी देखने दे संसार

मानेंगे पापा भी अब माँ
तुम बात बता के देखो तो
दादी नारी तूम भी नारी
सबको समझा के देखो तो
बिन नारी प्रित अधुरी है
नारी बिन सुना है घर-बार
मत मार मुझे जीवन देदे
मुझको भी देखने दे संसार

नही जानती मै इस दुनिया को
मैने जाना माँ बस तुमको
मुझे पत्ता मुझे है फिकर मेरी
तू मार नही सकती मुझको
फिर क्यु इतनी मजबुर है तू
माँ वसु है तू इतनी लाचार
मत मार मुझे जीवन देदे
मुझखशे भी देखने दे संसार

गर मै न हुई तो माँ फिर तू
कैसे दिल की बात बतारगी
मतलब की इस दुनिया में माँ
तु घुट घुट के राह जायगी
बेटी ही समझे माँ का इस
अकुंश करलो बेटी ये प्यार
मत मार मुझे जीवन देदे
मुझको भी देखन दे संसार
बेटी ये काखे से बोल रही
माँ कर दे तू मुझपे उपकार

कु.तेजस्विनी हातोलकर
बी.ए.भाग -१

# आजची शिक्षण व्यवस्था

शिक्षण व्यवस्था नाही
हा तर एक व्यापार आहे.
शिक्षणासाठी शेण माती झेलणाऱ्या क्रांती ज्योतीचा
हा घोर अपमान आहे.
विद्यार्थी आपले कर्तव्य,
आपली शिस्त विसरतात
शिक्षक लेक्चर द्यायचं सोडून
ऑफीस मध्ये धीरत बसतात
काय म्हणावं आजच्या पिढीला ?
व उद्याच्या सुजाणांना
क्लास रुम पेक्षा हे
गार्डन मध्येच जास्त दिसतात



आदर्शांची संकल्पना काय असावी
हा मला प्रश्न पडतो
लायकी नसतांनाही
त्यांना आदर्शाचा पुरस्कार त्यानांच मिळतो
काय विचार केला असेल
सावित्र ज्योती, आंबेडकरांनी
आपल्यासाठी शिक्षणाच्या
सोयी उपलब्ध करतांनी



खरच आपण त्यांच्या
विचारांना न्याय देतोय ?
आपल्याला दिलेली कर्तव्य
आपण निष्ठेने पूर्ण करतोय ?

' एक बंडखोर पण सत्य विचार '

कु.रोहीणी नयन वाघमारे
बी.ए.भाग -१

# माझी मातृ भाषा

मराठी भाषा, महाराष्ट्र संस्कृती आणि मराठमोळं वातावरण हे सारं महाराष्ट्राची शान आहेत. महाराष्ट्राचा इतिहास जगभरात सदैव प्रेरणादायी असाच आहे, इथली विविध पूर्ण साहित्य परंपरा कौतुकास्पद आहे.

अशा या महाराष्ट्रात काही स्वत:त्या उगाचच प्रगल्भ समजणारे लोक गौरवास्पद अशा मराठी भाषेला कमी देखण्याचा प्रयत्न करित आहेत.जणू काही या भाषेतत शिक्षण घेतले तर त्यांची अधोगतीच होईल. हा असा अपप्रचार करुन ते इथल्या मातीतल्या साहित्य संस्कृतीपासून आपल्या मुलांना वंचित ठेवीत आहेत, हे त्यांच्या ध्यानात का येत नाही ? इतर भाषा जरूर शिकाव्यात,कारणं कोणतीही भाषा हे संवादाचे साधन आहे. पण त्या आधी आपली मातृभाषा पक्की असली पाहिजे. तरच आपला आत्मविश्वास बळकट होतो.

कोणत्याही माध्यमात शिकणाऱ्या मराठी मुलांना जर आपली मातृभाषा संपूर्णपणे जाणून घ्यायची, अनुभवाची असेल, शिकायची असेल तर, मराठीतील वैविध्यपूर्ण साहित्य कृतींचे वाचन करावयास हवे.

माझी भाषा,माझी बोली आनंद वाचा, मराठी ओळी.

## शेतकऱ्याची व्यथा

म्हणतात शेतकरी जगाचा पोशिंदा
त्याच्या सहकार्यामुळेच मिळतो,
आपल्याला खांदा
पण आपल्या देशातील शेतकऱ्याचे
खुप खराब आहेत हाल
रस्त्यात व्याच्या आहे नवनवीन
सतुटाचे जाल.
पडत नाही भारतात पाणी अन्
पाऊस बिना पाण्याचा सांगा तो
कसा पिकवेल ऊस
पाणी लागते पिकायला वांगी
सागा याची ही व्यथा जो,
कोणाला सांगी



शेतीसाठी बिचारा काढतो कर्ज
पण बँक देत नाही कर्ज,
कितीही करुन अर्ज एवढेच नव्हे.
तर सावकार असतो नेहमी पैसे,
मागायला सुसज्ज
नवनवीन योजना सरकार काढतात.
शेतकऱ्यासाठी पण त्याचा काहीच,
फायदा होत नाही.
अशा परिस्थितीत काय,
करी गरीब शेतकरी
बांधुन छातीला व्याज्याच्या
कापसाचि दोरी
शेतकरी बिचारा आत्महत्या करी.



**कु.दिव्या गणेश राऊत**
बी.ए.भाग-२

## आयुष्य

आयुष्य सोबत असून,
जवळ कधी बसत नाही.
एकाच घरात राहून आम्ही,
एकमेकास दिसत नाही.
हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष संवाद
नित्य चाले वाद-विवाद
धाव धाव धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही.
ह्रदयाचे पाऊस कधी
ह्रदयाकडे वळत नाही.
इतक जगून झाले पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
कहीच कसला मेळ नाही.
क्षण एक येईल असा,
घेडन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास
अजूनही वेळ आहे.
थोड तरी जाणुन घ्या.
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरून बघुन घ्या.

# शिक्षक म्हणजे कोण ?

आपल्याला जन्म देणारी आई
लहानाचे मोठे करणारे बाबा
आणि शिक्षण देणारे ते म्हणजे शिक्षक।।१।।

भविष्य पाहण्यासाठी मदत करतात झाड
ते भविष्य उज्वल करणारे म्हणजे शिक्षक
भविष्यात आपली शिक्षणाने ओळख होईल.
ते शिक्षण देणारे म्हणजे शिक्षक ।। २ ।।

आपल्याला चिखलातून कमळ
बनविणारे, आपल्याला ज्ञान देवुन
पारिजातकासारखे आपल्या
ज्ञानाचा सुगंध चोहिकडे प्रसविणारे
दिव्य पुरन म्हणजे शिक्षक ।। ३ ।।

जसे झाडे लावले की पाऊस येतोच
तसेच शिक्षणामुळे यश मिळतेच
यश मिळणे याचे कारण म्हणजे शिक्षक।।४ ।।

कोण म्हणते देव नसतात
मी तर दोन देवांना बघितलं
पहिले माझे आई–वडिल
दुसरे म्हणजे माझे शिक्षक.....

## आई

एकमेव स्त्री जी माझा चेहरा
बघायच्या आधीपासून माझ्यावर
प्रेम करते.......

## बाबा

एकमेव माणुस जो माझ्यावर
स्वत: पेक्षाही जास्त
प्रेम करतो.......

'' मास्तर '' या शब्दावर खुप जोक ऐकले....
पण आज याचा अर्थ समजुन घेऊ या......
'' मा '' म्हणजे आई
'' स्तर '' म्हणजे पातळी, दर्जा
'' मास्तर '' म्हणजे आईच्या पातळीवर
जाऊन जीव लावणारा जीवनाचा स्तर
उंचवणारा व्यक्ती.

कु.कोमल अंभोरे
बी.ए. भाग -१




अकोला [illegible] येथे आयोजित उद्योग प्रदर्शनीत डॉ.पंकज [illegible] डॉ.ए.के.[illegible] समवेत विद्यार्थी



वृक्षारोपण करतांना डॉ.[illegible] तथा [illegible] प्रमुख [illegible]



मराठी भाषा गौरवदिना निमित्त मराठी ग्रंथ प्रदर्शनीत ग्रंथाची माहिती संकलन करतांना विद्यार्थी



नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी करतांना प्राचार्य तथा शिक्षकेतर कर्मचारी



ग्रंथपाल डॉ [illegible] ग्रंथ परिषदेत ग्रंथ निरिक्षण करतांना



पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ



प्रवीण्य विद्यार्थी राहुल [illegible] चे अभिनंदन करतांना प्राध्यापक वृंद



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी श्रीमती [illegible] सुनील [illegible] यांना भेटवस्तु देतांना



लोकमान्य टिळक पुण्यतिथी तथा अण्णाभाऊ साठे जयंती
कार्यक्रमामध्ये अध्यक्षीय भाषण करतांना प्राचार्य डॉ. व्ही.सी.खारोडे



डॉ.पकंज तायडे यांनी सार्वजनिक वाचनालयला कॉम्प्युटर दिल्या प्रित्यर्थ
अभिनंदन करतांना मा.जितेंद्र पापळकर,जिल्हाधिकारी ,अकोला.




रा.से.यो अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिना निमित्त
विद्यार्थ्यांना प्रबोधन करतांना डॉ.वासुदेव भगत



डॉ.अनिल ठाकरे पदवीदान समारंभात विद्यार्थ्यांना पदवी वितरण करतांना




रा.से.यो प्रमुख प्रा.रामकृष्ण गावंडे आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त विद्यार्थ्यांना व
शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना योग शिकवितांना



मराठी विभागाच्या वतीने आयोजित भाषा स्पर्धेत
प्राचार्य डॉ.व्ही.सी.खारोडे कु.रोशनी जयस्वाल ला पारितोषिक देतांना

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज

पिंजर, ता.बार्शिटाकळी जि.अकोला.

सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला
द्वारा संचालित

• नॅक, बंगलोर द्वारा थर्ड सायकल कम्प्लिटेड कॉलेज, ग्रेड 'बी' •

# स्व. भाऊसाहेब लहाने जन्मशताब्दी १९२२-२०२२

# विशेषांक



पक्षाला मोठे करणारे स्व. भाऊसाहेब लहाने यांच्या स्मृतीस

**'मोतीपुष्प' हा वार्षिकांक समर्पित**

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज

पिंजर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

२०२१-२०२२

# भाऊसाहेब लहाने यांच्या जीवनातील मोतीयाचे क्षण



महाविद्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन प्रसंगी
मा. प्रमोदजी महाजन स्व. भाऊसाहेबांचे स्वागत करतांना



मा. गोपीनाथजी मुंडे यांना मार्गदर्शन करतांना



मा. अटलबिहारी वाजपेयींसह स्नेहभोजन करतांना



भारतीय जनसंघ महाराष्ट्र प्रदेश अधिवेशनात स्व. भाऊसाहेब



स्व. भाऊसाहेब लहाने यांचा सहकारी वर्ग




देशाच्या राज्यसभेत स्व. भाऊसाहेब लहाने यांचे प्रतिनिधीत्व




मावनाधिकार न्याय जनसेवा ट्रस्ट, नवी दिल्ली या संस्थेचा
आदर्श समाज भूषण पुरस्कार स्वीकारतांना डॉ. नानासाहेब सपकाळ



महिला दिनी मंचावर उपस्थित व्याख्याते व
डॉ. ए. के. ठाकरे, डॉ. रेखा काळबांडे, श्री देवानंदजी वाकल



दत्तक ग्राम टिटवा येथे सेवानिवृत्त शिक्षकांचा
सत्कार करतांना प्राचार्य डॉ. व्ही. सी. खारोडे




खेलो इंडिया स्पर्धेत यु.सी.एम. या नात्याने सहभागी
डॉ. नानासाहेब सपकाळ



समान संधी केंद्राच्या उद्घाटनाचा उद्देश सांगताना
प्रा. एस.एम. मनवर




समान संधी केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी
प्राचार्य डॉ. व्ही. सी. खारोडे व प्रा. एस.एम. मनवर



# संपादकीय

आमच्या कला महाविद्यालयाचा हा **सोळावा वार्षिकांक** आपल्या हाती सोपवितांना मनस्वी आनंद होत आहे. **'मोतीपुष्प'** या विशेष नामाने हा अंक आम्ही दरवर्षी प्रकाशित करीत असतो. कोरोना आपत्तीमुळे मागील दोन वर्षांचा एकत्रित अंक काढावा लागला होता.

यंदा म्हणजे २०२२ मध्ये आमच्या **सुशिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा. श्रद्धेय स्व. भाऊसाहेब लहाने** यांचे **जन्मशताब्दी वर्ष** आम्ही विविध उपक्रमांनी साजरे केले. त्यामुळेच हा सोळावा वार्षिकांक आमच्या महाविद्यालयीन परिवारातर्फे स्व. भाऊसाहेब लहाने यांच्या चिरंतन स्मृतीला अतिशय कृतज्ञ भावनेने आम्ही समर्पित करीत आहोत.

महाविद्यालयाच्या स्थापनेला पंचवीस वर्षे पूर्ण झाली आहेत. प्रारंभी सात वर्षे महाविद्यालय विना-अनुदानीत होते. अनुदान प्राप्तीनंतर आमच्या महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. व्ही. सी. खारोडे** सर यांच्या कल्पक विचारातून महाविद्यालयाचा वार्षिकांक काढण्याचे ठरले. प्रारंभी आर्थिक अडचणी आल्यात. त्यावर मात करीत **'मोतीपुष्प'** हा वार्षिकांक दरवर्षी आगळे-वेगळे व देखणे रूप घेऊन प्रकाशित होत आहे. आमच्यासाठी ही आनंदाची बाब आहे. सत्र २०२१-२२ च्या उत्तरार्धात कोरोनाचे सावट दूर झाले. सगळीकडचे निर्बंध दूर झालेत. परिणामी विद्यार्थी-विद्यार्थीनी मुक्तपणे महाविद्यालयात उपस्थित राहून प्रत्यक्ष शिक्षण घेऊ लागलेत.

यावर्षीच्या अंकात आम्ही स्व. भाऊसाहेब लहाने यांच्या विचार व कार्याला उजाळा देणारे विविध लेख मान्यवरांकडून मागविलेत. त्या लेखांमधून स्व. भाऊसाहेब लहाने यांचे जीवनचरित्र उलगडत गेले आहे. देशातील मान्यवर आणि सन्माननीय लोकप्रतिनिधींनी स्व. भाऊसाहेबांच्या स्मृतिप्रित्यर्थ शुभेच्छा संदेशांचा वर्षाव केला आहे. त्यानंतर महाविद्यालयात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या हृदयांची स्पंदने विविध कविता व लेखांमधून अभिव्यक्त झाली आहेत. महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग हा उच्च शिक्षणाचा कणा आहे. त्यांच्या सम्यक विचारातून या अंकाचे वैभव वाढले आहे. असा हा सर्वांगसुंदर वार्षिकांक आपण जरूर वाचावा, ही विनंती.

**-: संपादक मंडळ :-**

**डॉ. एम. के. फडणीस** | **डॉ. ए. व्ही. वाहुरवाघ**
**प्रा. आर. एन. गावंडे** | **कु. करुणा अंभोरे**

**प्रकाशक :- सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर** ता. बार्शिटाकळी जि. अकोला.

**मुद्रक :- 'प्रिंटवेल'**, मंगलदास मार्केट, **अकोला.** (भ्रमणध्वनी : ९४२२८६१६१२)

* **'मोतीपुष्प'** या वार्षिक अंकातील सर्व विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | संपादकीय | डॉ. एम. के. फडणीस | I |
| | शुभेच्छा संदेश | डॉ. मोहनजी भागवत, मा. श्री. संजयजी धोत्रे, मा. श्री. रणजित पाटील, मा. श्री. रणधीर सावरकर मा. श्री. गोवर्धन शर्मा | |
| | मानपत्र | मा. श्री. ब्रिजलाल बियाणी | |
| १) | प्राचार्यांचे मनोगत | डॉ. व्ही.सी. खारोडे | १ |
| २) | निष्ठेने पक्षाला मोठे करणारे लहाने | डॉ. श्रीकांत तिडके | ३ |
| ३) | आम्ही जातो आमुच्या गावा ..... | ॲड. श्रीदेवी साबळे | ६ |
| ४) | स्व. भाऊसाहेब लहाने यांच्या जन्म शताब्दीच्या निमित्ताने | श्री. भा. ना. राऊत (माजी प्राचार्य) | ११ |
| ५) | भाऊसाहेब लहाने : एक दृष्टीक्षेप | डॉ. व्ही.सी. खारोडे | १३ |
| ६) | The Uncommon Somebody | प्रा. अनिल एम. गुल्हाने | १८ |
| ७) | सहकारातून ग्रामीण विकास- स्वप्नवंत भाऊसाहेब | डॉ. पंकज तायडे | २१ |
| ८) | निश्चयाचा मेहामेरू : स्व. भाऊसाहेब लहाने | डॉ. एम. के. फडणीस | २८ |
| ९) | माझ्या आठवणीतील दिव्यदृष्टीचे भाऊसाहेब | प्रा. रामकृष्ण एन. गावंडे | ३१ |
| १०) | लोकनायक भाऊसाहेब | डॉ. अशोक व्ही. वाहुरवाघ | ३४ |
| ११) | माझ्या आठवणीतील भाऊसाहेब | श्री. भा. ना. राऊत | ३८ |
| १२) | महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या कविता व सुविचार | | ४० ते ६१ |
| १३) | वक्तृत्व | राहुल सावंत | ६२ |
| १४) | मैत्री | कु. दिपाली घाटोळकर | ६५ |
| १५) | मी अनुभवलेला कोरोना काळ | कु. राणी भा. सारसे | ६७ |
| १६) | तरुणांनो महापुरुषांचा आदर्श घ्या ! | विष्णू घुमसे | ६९ |
| १७) | शाळा बंद होण्याचा परिणाम ... | कु. भाग्यश्री मुळे | ७१ |
| १८) | समलैंगिकता - वास्तव | कु. अश्विनी पडघाने | ७३ |
| १९) | कोरोना | कु. आचल वि. देवगिरकर | ७५ |
| २०) | ऑनलाईन शिक्षण | कु. शुभांगी काकड | ७६ |
| २१) | गुस्सा आता नही, लाया जाता है | परिमल राऊत | ७८ |
| २२) | शेतकरी आत्महत्या एक सामाजिक समस्या | डॉ. अनिल यु. ठाकरे | ७९ |
| २३) | शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण | प्रा. एस. एम. मनवर | ८४ |
| २४) | समाज विकासामध्ये ग्रंथालयाचे योगदान | डॉ. रेखा एस. काळकांडे | ८६ |
| २५) | छ. शिवाजी महाराजांसंबंधी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे अध्ययन | डॉ. वासुदेव वा. भगत | ८९ |
| २६) | सूर्यनमस्कार - योगाचा एक परिपूर्ण व्यायाम | डॉ. नानासाहेब सपकाळ | ९३ |
| २७) | राष्ट्रीय सेवा योजना - वार्षिक अहवाल (२०२१-२२) | प्रा. रामकृष्ण एन. गावंडे (कार्यक्रम अधि.) | ९७ |
| २८) | खरा तो एकचि धर्म | साने गुरूजी | १०७ |
| २९) | सामुदायिक प्रार्थना | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | १०८ |

## जीवन

जीवन कोणासाठी थांबत नाही. फक्त जीवन जगण्याची कारणं बदलतात.

सर्वच प्रश्न सोडवून सुटत नाहीत. काही प्रश्न सोडून दिले की आपोआपच सुटतात.

**जीवन म्हणजे काय ?**

कधी स्वतःलाच फोन लावून बघा, लागणार नाही. तो व्यक्ती दाखवेल जगात. आपल्याकडे सगळ्यांसाठी वेळ आहे पण स्वतःसाठी मात्र आपण व्यस्त आहोत.

जीवनात एकदा तरी 'वाईट' दिवसांना सामोरे गेल्याशिवाय 'चांगल्या' दिवसांची गरज कळत नाही.

जीवनात प्रश्नांची चांदी अशी की, उत्तरांनाच प्रश्न पडावे... मनालाही समजत नाही मग रडत बसावे की हसत रडावे !

जीवन..... चांदण तेच असलं तरी मात्र अगदी नवीन आहे.... आयुष्य मात्र एकदाच का ? हा प्रश्न जरा कठीण आहे.

ठरवलं ते प्रत्यक्षात होतेच असं नाही आणि जे होते ते कधी ठरवलेलं असतेच असही नाही.

**यालाच कदाचित आयुष्य म्हणतात.**

**कु. दिपाली शिवहरी घाटोळकर**
बी. ए.- भाग ३

## प्रेम असंच असतं

असं फक्त प्रेमच असतं
त्याला ह्रदयातच जपायचं असतं
प्रेमात अधिकार असतो पण गाजवायचा नसतो.
प्रेमात गुलाम असतो .. पण राबवायचा नसतो.
प्रत्येकाला स्वातंत्र्य असतं
पण स्वतःला स्वातंत्र्य नसतं.
नेहमी एकटच असतं
पण दुसऱ्याशिवाय शक्य नसतं
कळत नकळत कसं होतं, मात्र कधीच कळत नसतं
**असं फक्त प्रेमच असतं.**

## मुलींच जगनं फार कठिन असतं

मुलींच जगनं पण फार कठीनचं आहे ...
अतिरिक्त शिक्षण घेतल्यास लोक म्हणतील
जास्त हुशार झाली. न शिकल्यास अज्ञानि असेल.
वाचता, लिहता आलं नसेल म्हणून शिकली नाही.
मुलांशी मित्रता बनविल्यास नालायक
मुलांशी न बोलल्यास अतिहुशार
स्मार्ट जिन्स घातल्यास चारित्र्यहीन
साडी घातल्यास सातिसावित्री
ना पायी चालू देत, ना बसु देत.
मुली जगनार तरी कसं जगनार ?



**कु. नेहा विजय पवार**
बी. ए.- भाग १

## पहिला पाऊस

थेंब पावसाचे जमिनीवर पडता
माती मधुनी येई सुगंध
हिरवेगार होईल रान
त्या रानामध्ये वेगळा आनंद

थेंब पावसाचे जमिनीवर पडता
मन आपुले होई प्रसन्न
चेहऱ्यावरती येई वेगळाच आनंद
मनामध्ये येई नवी किरणं

थेंब पावसाचे जमिनीवर पडता
सुटतो गार वारा
मोर फुलविती सुंदर पिसारा
पक्षांचा सूर तो किलबिलाट सारा

थेंब पावसाचे जमिनीवर पडता
हिरवे-हिरवे रान सारे
गाई-गुरांना मिळतो चारा
आनंदाने राहतील सारे

कु. आकांक्षा प्रदिप मांढवकार
बी. ए. भाग १

## मुलगी

जन्म घेतला मी मुलीचा
कोणास मी नकोशी ।
तर कोणास मी
हवींहवीशी ।।
जन्म घेतला मी मुलीचा ...

काळाने केला घात
समाजातील विकृतीचा हा आघात ।
ठणकावून सांगावेसे वाटते,
मी पण आहे पणती या घरची
नका लादू माझ्यावरती बंधनाची सक्ती ।।
जन्म घेतला मी मुलीचा ...

घेवू द्या मला मोकळा श्वास,
घेवू द्या मला शिक्षणाचा ध्यास ।
मी पण घडवेन इतिहास,
घेवून वसा माणुसकीचा ।।
जन्म घेतला मी मुलीचा ...



कु. निकिता ...
बी. ए. ...

## माणसा पहिले तू माणूस बन !

पुन्हा हे मिळणार नाही जीवन ।
माणसा पहिले तू माणूस बन ।।

भले तू मोठा विद्वान बनला ।
ज्ञानी पंडित महान बनला ।।
काही कामाचे जरी का नाही ।
तुझ्यात माणूसपण ।।
माणसा पहिले तू माणूस बन ।।
जन्म मानवी असे महान ।
कृती नसावी पशू समान ।।
अरे मानवा दानवा परी ।
करू नको वरतन ।।
माणसा पहिले तू माणूस बन ।।
सोडूनी अहंकार आपल्या मनाची ।
संगत करावी सदा सज्जनाची ।।
तुला माणसाने माणूस मानावे ।
शिक अशी शिकवण ।।
माणसा पहिले तू माणूस बन ।।
आरूढ होऊनी भक्ती रथावर ।
मानवतेच्या चाल पथावर ।।
एक नाम सदा जपावे माणूसकी ।
माणूसकीचे धन ।।
माणसा पहिले तू माणूस बन ।।

**कु. रिंकू रंजीत राठोड**
बी. ए.- भाग १

## || मी मराठी ||

मराठी ही भाषा अमुची आहे, महाराष्ट्राची शान ।
ज्ञानेश्वरी, लिळाचरित्र अशी ग्रंथ महान ।।
मराठी भाषा अमुची जणू रत्नांची खाण ।
जन्मले मराठी म्हणूनी मला त्याचा अभिमान ।
जनाबाई, मुक्ताबाई आहे, इथे स्त्रियांनाही मान ।
ना गरीब ना श्रीमंत, इथे सर्वांनाच सन्मान ।।
जन्मले मराठी म्हणूनी मला त्याचा अभिमान ।
बोलता मराठी होते, मायेची जान ।
प्रेमाची ऊब जणू, ही नव्हे शब्दाचे वाण ।।
जन्मले मराठी म्हणूनी मला त्याचा अभिमान ।
भाषेमुळेच कळतात, एकमेकांच्या मनातील भाव ।
म्हणूनच तर देतात, सगळे मराठीला वाव ।।
मराठी शब्दामुळेच होते,
आपुलकी नी प्रेमाची जाण ।।
या मराठी महाराष्ट्राची, पवित्र ही माती ।
जुळवती आपल्या मनाची नाती ।।
मराठी भाषा आहेच छान ।।
मराठी ही भाषा अमुची आहे
महाराष्ट्राची शान ।
सर्व देश गाई, मराठीचे गान ।
मराठीचा इतिहास घडवणारे
छत्रपती शिवराय महान ।।



**कु. दिपाली शिवहरी घाटोळे**
बी. ए. भाग

## ।। नव्या जगाची आशा ।।

कसं जगावं कसं वागावं
हे शिकवलंत **फडणीस** सर तुम्ही
पाण्याविण झाड जसं
तुमच्याविण होतो आम्ही ।।धृ।।

तुमच्या व्यक्तीमत्वाची आगळीच
चकाकी आहे **मनवर** सर
तुम्हाला बघून कोणीही
थरारून सुटेल खरंतर ।।१।।

कुठलाही प्रश्न विचारला तरी
तुमच्याकडे समर्थन होईल **भगत** सर
तुम्ही कधीच म्हणणार नाही,
बघुयात जमलं तर... ।।२।।

आयुष्याच्या वाटेवर असतील
कितीही काटे जर
तुमच्या सत्कार्याची ओढ,
चांगुलपणाची गोड
मोडेल ही काटे **गावंडे** सर ।।३।।

अथांग सागर गाठण्याचा
आत्मविश्वास देते ती ओंजळ
म्हणजे संस्कार **तायडे** सर
तुमची माया नाही खरंच वरचेवर ।।४।।

कळतच नाही सर मला
काय लिहावं तुमच्यावर



गुरुशिवाय ज्ञान नाही,
गुरुशिवाय जाण नाही,
जाणीवेच्या पलीकडे समजुन
सांगतात **वाहुरवाघ** सर ।।५।।

मराठी भाषेची गौरव गाथा
इंग्लीश भाषेने केला कहर
जीव ही नौका आहे खरेतर
पण नौकेचा तीर तुम्ही
आहात **ठाकरे** सर ।।६।।

भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
म्हणतात तुम्हाला ग्रंथपालाची राणी
पाण्याविण झाड जसं,
**काळबांडे** मॅडम,
तुमच्याविण होतो आम्ही ।।७।।

तहानेत व्याकुळ झालेल्या पक्षाला
थेंबभर पाण्याने
दिला आधार तुम्ही
**खारोडे** सर पाण्याविण झाड जसं
तुमच्याविण होतो आम्ही ।।८।।



**कु. करुणा गुणवंत अंभोरे**
बी. ए. भाग २





# वक्तृत्व

राहुल रा
री. ह

बोलणे हा केवळ जगाच्या व्यवहारातला उपचाराचा भाग नाही. बोलण्यातून भाषा, साहित्य, समीक्षा, संस्कृती आणि पर्यायाने त्या समाजाचे उन्नयन होत असते. म्हणुनच वाचिक अभिव्यक्तिकडे गांभीर्याने पहायला हवे. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी वक्तृवाची साधी, सोपी आणि सरळव्याख्या केलेली आहे. ते म्हणत,'एखाद्याचे बोलणे ऐकत रहावे असे ऐकणाऱ्याला वाटते तेव्हा बोलणाऱ्याच्या बोलण्यातून आविर्भूत होणारे, आविष्कृत होणारे आणि प्रकट होणारे ते वकृत्व.'

एखाद्याजवळ उदंड ज्ञान असते ; पण ते इतरापर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक असलेली शब्दशक्ति असते, पण ज्याच्यासाठी ती वापरायाची ज्ञान नसते. ग्रंथाचा उदय होण्यापूर्वी वक्तृवाने फिरती ज्ञानपोई चालवली. बोलणे हे साहित्याचे पहिले रूप आहे. आरंभीचे बहुतांशी साहित्य खऱ्या अर्थाने वाङ्मय होते. संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी आधी सांगितली नंतर साच्चिदानंद बाबांनी ती लिहून घेतली. ऐसी अक्षरे रसिकें । मेळवीन अशी प्रज्ञा असणाऱ्या ज्ञानेश्वरानी देखील साहित्याचे पाहिले रूप प्रधान मानले . कौरव पांडवांच्या युध्दाल हतबल झालेल्या अर्जुनाला उभे करण्यासाठी श्रीकृष्णाने सगळी शस्त्रे बाजुला ठेवून शेवटी वक्तृवाचे शस्त्र हाती. घेतले. आणि अर्जुनाला गीता सांगितली, इतके वक्तृवाचे मोठेपण आहे.

शब्द हे वक्तृत्वाचे शरीर, विचार हा आत्मा आणि वक्त्याच्या वक्तृवातून पाझरणारे नानाविध रस हे अ आभूषणे असतात. शब्दशक्तिचे गर्वयुक्त प्रदर्शन क वक्त्यांची आपली ज्ञानशक्ति वाढवली, तर त्या ज्ञा श्रोते आदराने नतमस्मक होतात.

यातच वक्तृवाचा खरा आनंद आहे. वक्तृत्वाला अभिप्रेत असणारे काम होणार आहे. कवी सोहिरोबा आंबिये म्हणत,

विवेकाची ठरेल ओल, जे बोलायचे ते ऐवा
आपुले मते उगीच चिखल, कालवु नको रे

उत्तम वक्ता होण्याची महत्वाकांक्षा असणाऱ्या उत्तम श्रोता झाले पाहिजे. अनेकांची व्याख्या पाहिजेत. वक्तृवाचे नानाविध आकार आणि प्रकार पाहिजेत. उत्तम वक्ता होण्यासाठी उत्तम व आले पाहिजे. वाचून, थांबून, विचार करूनच पाहिजे. जसे खाल्लेले पचविल्याशिवाय भाष सुदढ होत नाही, तसे वाचलेले ही पचवावे वाचले कुठे वाचले, कशाला वाचले, याची नोंदी सवय असेल तर एखाद्या विषयाची व्याख्यान करताना त्याचा खूप फायदा होतो.

' सर्वसारसंग्रह ' या नावाचे अनेक स्वातंत्र्यवीर सावरकरांची टिपणवही पाहिल्या आश्चर्यचकित होतो. सावरकर म्हणतात वक्तृत्वाचा पाया या टिपण वहिने मजबूत

वाचनातून मनाच्या गाभाऱ्यात वन्ही विचार शिरले की, त्यांना नवे धुमारे फुटू शकतात. म्हणून गंभीरपणाने वाचन केले पाहिजे.'

वक्त्याच्या ठायी एखादया सुगरणीचे कौशल्य असणे आवश्यक आहे. सुगरणीजवळ स्वयंपाकघरात सर्व प्रकारची सामग्री आणि वस्तू उपलब्ध असतात ; पण 'स्वयंपाक' ही तिचीच मिरासदारी असते, पण तिची कल्पकता आणि सर्जनशीलता यातून रूचकर पदार्थ तयार होतात हे कसब वक्त्याला साधता आले पाहिजे. आजवर केलेले वाचन, घडलेले श्रवण यावर स्वतःच्या व्यक्तिमत्वाचे, विचाराचे काही संस्कार ज्याला करता येतात, त्याचे वक्तृत्व इतरांपेक्षा वेगळे उठून दिसते. ही कला एका दिवसात आत्मसात करता येत नाही. स्वयंपाक हा जसा करता येतो, सराव करून खेळ जमतो, रियाज करूण गाणे जमते, तालमी करून नाटक जमते तसेच वक्तृत्वाचे देखणे रूप साधनेतूनच आकाराला येते. वक्तृत्व ही केवळ शब्दांची आतषबाजी निष्ठापूर्वक करणाऱ्यांनाच वाग्देवता प्रसन्न होते.

मनात एकदा विषयाचा आराखडा तयार झाला की, त्याचे 'चिंतन' केले पाहिजे. जशी पॉलिशमुळे सोन्याला झळाळी येते तसे चिंतनामुळे वक्तृव तेजस्वी होते. श्रवण आणि वाचन, मनन आणि चिंतन यांना एकांताचे कोंदण लाभले तर वक्त्याचे वक्तृत्व झळाळून निघते.

अनेक वक्त्यांना हातात मुद्यांचे टिपण घेऊन बोलणे सोयीचे वाटते किंवा अपरिहार्यही असते. पण कागद किंवा टिपण हा वक्ता आणि श्रोता यांच्यातला मोठा अडसर ठरु शकतो. वक्ता टिपणात अडकून राहतो. श्रोत्यांच्याही वाट्याला एकाग्रता येत नाही. त्यामुळे जो टिपणाशिवाय संवाद साधतो त्याचा अधिक प्रभाव पडतो. मनन आणि चिंतन प्रभावीपणे करता आले तर स्मरणात सर्व काही उत्तम राहू शकते. स्मरणशक्ती ही एखाद्या वेलीसारखी असते. सर्व घटक योग्य प्रमाणात मिळाले, की जशी वेलीची वाढ होते तसेच लेखन, वाचन, मनन आणि चिंतन मनःपूर्वक केले की स्मरणशक्तीची वेल गगनाला जाऊन भिडू शकते.

स्वामी विवेकानंदांना एनसायक्लोपीडीया ब्रिटानिकाचे सर्वच्या सर्व खंड मुखोद्‌गत होते. कोणताही संदर्भ कोणत्याही टिपणाशिवाय ते देऊ शकत होते. जशी आपण शरीरसंपदा कमावतो, तशीच स्मरणशक्तीही कमवता येऊ शकते. ज्या वक्त्यांपाशी स्मरणशक्ती असते, त्यांचे वक्तृत्व अधिक नेटके, सुडौल आणि सुरस होते. वक्ता ज्यावेळेस बोलत असतो तेव्हा एकाच वेळी दोन क्रिया घडत असतात. स्वतःशी विचार करित करित तसे बोलत असतो, त्याच वेळी तो श्रोत्यांशी संवाद साधत असतो. त्याच्या विचारांचा वेग आणि प्रतिपादनाचा वेग या दोन्ही वेगाला खूप महत्व आहे. वक्तृत्वात वेग आवश्यक आहे.

कारण त्याशिवाय भाषण प्रभावी आणि प्रवाही होत नाही. पण प्रचंड वेगाने बोलणारे वक्ते स्वतःचे आणि श्रोत्यांचेही नुकसान करतात. धपधप पडणारा पाऊस जमिनीच्या पृष्ठभागावरुन लगेच वाहून जातो. पण हळूवार येणाऱ्या पावसाच्या सरी जमिनी मध्ये खोलवर जातात आणि त्यावर पिकांचे चांगले पोषण होते. हळूवार तरीही प्रवाही वक्तृत्व श्रोत्यांच्या अंतःकरणाच्या तारा छेडू शकते.

वक्त्याच्या ठायी शब्दशक्ती, विचारशक्ती, स्मरणशक्ती याचबरोबर एक अवधानशक्ती असली पाहिजे. आपण कुठे बोलतो आहोत, श्रोत्यांची मानसिकता कशी



आहे, समारंभाचा उद्देश काय आहे, याचे आकलन ववत्याला व्यासपीठावर येतांना आणि व्यासपीठावर बसल्यावर झाले पाहिजे. आपले तेच खरे असे मानणारे आणि श्रोत्यांवर प्रत्येक गोष्ट लादणारे वक्ते लवकर कालबाह्य होतात. प्रत्येक वक्त्याला स्वतःची म्हणून शैली असावी लागते. कोता आवाज, वक्तृत्वाचा प्रभाव पाडू शकत नाही. गायक आवाज कमावतात. त्यासाठी नानाविध प्रकारचे व्यायाम, प्राणायाम, ॐकाराचे उच्चारण करतात. आवाज कमावण्यासाठी हे सारे मार्ग वक्त्याने ही ओळखले पाहिजे. वक्ता होण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणांपैकी एकही गुण नसलेला डेमॉस्टेनिस महान वक्ता झाला. त्याचे चरित्र आवाज कोता, कमकुवत आणि कापरा होता. तो रोज धावण्याचा सराव करु लागला. टेकड्यावरुन चढ-उतर करु लागला. त्याची श्वसनशक्ती मजलेदार झाली. पल्लेदार वाक्ये धाप न लागता त्याला पेलता येऊ लागली. तरीही एक अडचण जाणवली. त्याचा आवाज पल्लेदार झाला पण दमदार झाला नाही. त्याला वजन, विस्तार आणि व्याप्ती नव्हती. तो सागरतीरावर जाऊन मोठ्याने बोलू लागला.

लाटांनाच श्रोते मानून तो बोलत राहिला. त्याची वाणी खणखणीत झाली. गालावरचे, मुद्रेवरचे आणि जिभेवरचे स्नायू बळकट व्हावेत म्हणून काही काळ लोकभ्रमाच्या आहारी जाऊन तो तोंडात गारगोट्या धरुन बोलण्याचा प्रयत्न करीत होता. त्यात थोडी गंमत आणि बराचसा वेडेपणा होता.

आवाज तयार झाला. शब्दसामर्थ्य आणि भाषावैभव संपादन करण्यासाठी त्याने युसिडिडिज या लेखकाचा इतिहासग्रंथ अनेकदा वाचला. काहीवेळा तो अक्षरशः आणि विरामशः उतरवून काढला. त्याच्या आणि बोलात भाषा भिजली. एक जिव्हाजड माणू वक्ता झाला. ग्रीस देशातल्या वक्तृत्व पंढरीचा झाला.

वक्तृत्व आणि आरोग्य यांचा खूप जवळ आहे. एक-दीड तास सलग बोलण्यासाठी अंगा रग असावी लागते. पल्लेदार वाक्ये उच्चारतान टिकवून ठेवावा लागतो. अनेकदा परगावी एक व्याख्यान देण्यासाठी बारा-चौदा तासांचा प्रवा लागतो. त्याचा शीण बाजूला ठेऊन प्रसन्न मुद्र सामोरे जावे लागते.

व्यासपीठावरील चिंतनशील वक्तृवाची आज मोठी होत असली तरी बोलण्याचे किंवा नेटक्या व महत्त्व कदापी ही कमी होणार नाही उलट ते आहे. संवाद, मुलाखती, परिसंवाद, चर्चासत्रे अशा अनेक रूपात भरजरी यातच जे वावरे अशा उत्तम बोलता येणाऱ्याचे हे दिवस आहेत. करण्यापासून कॉर्पोरेट जगतात उच्चरवात आपले मांडण्यापर्यंत प्रत्येक छोटया-मोठ्या गोष्टींशी निगडीत आहे.

बोलणे हा केवळ जगाच्या व्यवहारातील भाग नाही बोलण्यातून भाषा, साहित्य, समिक्षा आणि पर्यायाने त्या समाजाचे उन्नयन होत असते वाचिक अभिव्यक्तिकडे गांभीर्याने पाहायला हो



# मी अनुभवलेला कोरोना काळ

**कु. राणी भाऊसाहेब सारसे**
बी. ए.-भाग १

**"चीनमधून आलेली ही स्वारी, जगासाठी ठरली सगळ्यात मोठी महामारी
खबरदारी घेणे हिच आपली जबाबदारी."**

विज्ञानाच्या या युगात मानवाला अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. याच संकटात भर म्हणजे सध्याची असलेली महामारी होय. मी बोलतेय कोरोनाविषयी. त्याने जगातील सर्वात मोठ्या महामारीचे रूप घेतले आहे. अमेरिका सारख्या महासत्ता देश ही कोरोना पुढे हतबल झाले आहे.

कोरोना हा विषाणु पासून तयार झालेला रोग आहे तो सगळीकडे "कोविड-१९" म्हणून ओळखला जातो. २०१९ मध्ये चीनच्या वुहान शहरात त्याची सुरूवात होऊन आजपर्यंत तो जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचत जागतिक महामारीचे रूप घेतले. या आजाराच्या सामान्य लक्षणांमध्ये उच्चताप, सर्दी, खोकला, श्वास घेण्यात अडथळा याचा समावेश आहे.प्रचंड थकवाही जाणवतो. लागण झाल्यापासून लक्षणे दिसण्याचा कालावधी दोन ते चौदा दिवसापर्यंत असू शकतो. हा आजार बहुतेक लोकांमध्ये अगदी सौम्य असतो. तर अगदी अल्प प्रमाणात घातक ठरू शकतो.

हा विषाणु प्रामुख्याने जवळच संपर्कामुळे पसरतो. खोकल्यामुळे, शिंकल्यामुळे किंवा बोलतांना आपल्या थुंकीतून कोरोना पसरतो. या विषाणुपासून स्वतःला दूर ठेवण्यासाठी वारंवार हात धुतले पाहिजे. मास्कचा वापर केला पाहिजे. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळले पाहिजे. अत्यावश्यक असेल तरच घराच्या बाहेर पडले पाहिजे.

सरकारने कोरोनाला आटोक्यात आणण्यासाठी लॉकडाऊन म्हणजेच बंद ठेवला आहे. या कोरोनामुळे अनेक माणसे मारली गेली. रोजगार बंद झाले. व्यवसाय बंद पडले. शिक्षण व्यवस्था, पर्यटन, चित्रपटसृष्टी, कृषी व्यवसाय यांच्यावर विपरित परिणाम झाले. अनेक देशांच्या अर्थव्यवस्थाही मंदावल्या. एकंदरीतच जनजीवन विस्कळीत झाले.

कोरोना व्हायरस विरूद्ध लढण्यासाठी रात्रं-दिवस डॉक्टर, पोलीस, सफाई कर्मचारी, नर्स, जनसेवक प्रयत्न करत आहेत. आपणही कोरोनाला हरवण्यासाठी सरकारने सांगितलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे.

वरील परिस्थितीवरून मला एक वाक्य आठवले.

**गाव हा विश्वाचा नकाशा**
**गावावरून देशाची परीक्षा ।**
**गावाची बघता अवदशा**
**येईल देशा ।।**

राष्ट्रसंतसच्या या अभंगाची प्रचिती येण्याचा हा जीवघेणा काळ. खरोखर एक असा काळ . ज्यामुळे

विद्यार्थ्यांचे फार मोठे नुकसान झाले. कोरोना बिमारीने सर्वत्र हाहाःकार घातला. सर्वत्र लॉकडाऊन लागले. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा नवीन प्रश्न उभा राहिला. त्यामध्ये काही परीक्षा रद्द केल्या व काही परीक्षा ऑनलाईन घेतल्या. तसेचविद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणामुळे कॉम्प्युटर, लॅपटॉप, स्मार्ट फोन, इंटरनेट आणि त्यांना हाताळण्याचे ज्ञान आले.

ज्याप्रमाणे एका नाण्याला दोन बाजू असतात, त्याचप्रमाणे ऑनलाईन शिक्षणाचेसुद्धा फायद्याबरोबरच तोटे आहेतच. तासन् तास कॉम्प्युटर स्क्रीनसमोर बसून बसून मुलांचे डोळ्यांचे आरोग्य धोक्यात आहे. बसून-बसून मुलांचे खेळ-व्यायाम बंद झाले. शारिरीक हालचाली बंद झाल्या आहेत. त्यामुळे मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

**पंछी, हवा, पानी सब बाहर है ।**
**लेकिन इंसान कैद है ।।**

त्यातच ब्लॅक फंगस, वाईट फंगस या सारख्या अनेक महामारीने देशात थैमान घातले होते. आता कुठे परिस्थिती आटोक्यात आली आहे. सरकारने सर्वांनी लस घ्या ही गाईडलाईन प्रचलित केली. सर्वांनी लस घेतली. त्यामुळे ही महामारी आटोक्यात आली व सरकारने शाळा, कॉलेजेस पुन्हा आता उघडले. खरंच हा काळ खूप जीवघेणा होता.

**इस कोरोनाने**
**किसी के अपने ले गया**
**तो किसी के सपने ....**

## कोरोना

या वर्षी चीनमधून विचित्र संकट आल
या संकटामुळे मात्र जग सगळ ठप्प झाल ।
काम, उद्योग बंद सगळे,
याच वर्षी घडले आगळे ।।

कोरोना आहे नाव आणि चीन आहे त्याच ...
दिसत नसून मनात निर्माण केला भितीचा ...
सगळे सांगतात चीन हेच कोरोनाचे माहेर
पण हा तर म्हणतोय हे विश्वची माझे घर ।।

दूर राहायचे असेल त्याच्यापासून तर आहे ...
जवळ ठेवा सॅनिटायझर आणि तोंडाला लावा ...
राहा घरात पडू नका बाहेर,
पडाल बाहेर तर, कोरोना हाच मिळेल अहेर ।

लॉकडाऊन झालं सगळीकडे झाली सर्वत्र शांत...
कोरोनामुळे झाली माणूसकीची सांगता ।।
पण मात्र कोरोनाने स्वतःकडे पाहायला शिकव...
धावपळीच्या या युगात मागे वळून पहायला शिकव...
समजवा मनला येईल सगळं पूर्वपदावर सुरु होईल...
जुन्या आठवणी व परिवारासंगे आजचा क्षण ...



कु. निकिता सु. ...
बी. ए. ...

# क्षणचित्रे



दत्तकग्राम टिटवा येथे वृक्षरोपे देतांना प्रा. रामकृष्ण गावंडे
व श्री ग. का. वानखेडे



भेंडीमहाल येथे वसुंधरा दिना निमीत्त वृक्ष रोपे देतांना
राष्ट्रीय सेवा योजनेची चमू व प्राध्यापक




शिबीरार्थ्यांच्या श्रमदानातून निर्मित
रा.से.यो. चमू ने बांधलेला बंधारा



मराठी भाषा गौरव दिनानिमित्य विद्यार्थ्यांना संबोधित
करतांना डॉ. एम. के. फडणीस



डॉ. संदीप ढोंगरे यांच्या व्याख्यानाचे प्रास्ताविक करतांना
अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. एम. तायडे



खेलो इंडिया स्पर्धेत (बेंगलोर) येथे
डॉ. नानासाहेब सपकाळ व क्रिडा प्रशिक्षक

सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला
द्वारा संचालित

नॅक, बंगलोर द्वारा थर्ड सायकल मानांकित महाविद्यालय, श्रेणी 'बी'

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज

**पिंजर**, ता.बार्शिटाकळी, जि.अकोला

# मोतीपुष्प

२०१८-१९ **वार्षिकांक**



## आदर्श विद्यार्थी व उत्कृष्ट पालक पुरस्कार





आदर्श विद्यार्थी पंकज राठोड व उत्कृष्ट पालक श्री वासुदेव राठोड यांना पुरस्कारांचे वितरण करतांना
सु. शि. प्रसारक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष डॉ. सुबोधचंद्रजी लहाने,
प्राचार्य डॉ. व्ही. सी. खारोडे आणि प्रा. डॉ. एम. के. फडणीस



महाविद्यालयास सदिच्छा भेट देतांना मानवविकास संसाधन
राज्यमंत्री ना. संजयभाऊ धोत्रे



महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी श्री संतोष गिरी उत्कृष्ट कर्मचा
म्हणुन यांचा सत्कार करतांना अध्यक्ष मा. श्री सुबोधचंद्रजी लहा
व प्राचार्य डॉ. व्ही. सी. खारोडे



प्रा. डॉ. रेखा एस. काळबांडे (अंबुलकर) यांनी
ग्रंथालय शास्त्र विषयांमध्ये आचार्य पदवी (पीएच्. डी.)
प्राप्त केल्याबद्दल तसेच उत्कृष्ट शिक्षक म्हणुन निवड
झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करतांना डॉ. सुबोधचंद्रजी लहाने
व प्राचार्य डॉ.व्ही.सी. खारोडे



कायदे विषयक जनजागृती कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करतांना
ॲड. केशव इंगोले, ॲड. विनीत सिरसाट,
ॲड. गणेश मुजर व इतर मान्यवर




दत्तकग्राम भेंडीमहाला येथील श्रमसंस्कार शिबीरातील विद्यार्थ्यांनी बांधलेला बंधारा.



सामाजिक वनीकरणाचा भाग म्हणून १३ कोटी वृक्ष योजनेला प्रतिसाद म्हणून जुलै महिन्याच्या पहिल्या सप्ताहात ५० वृक्षांची लागवड करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खारोडे आणि त्यांचे शिक्षक कर्मचारी



ग्राम खेर्डा येथे दि. २९ नोव्हेंबर २०१८ रोजी संविधान जनजागृती कार्यक्रमाची मशाल रॅली



दि. २४ नोव्हेंबर २०१८ रोजी संविधान जनजागृती सप्ताहात पिंपळगांव चांभारे येथे उद्घाटनपर भाषण देतांना प्राचार्य डॉ. व्ही. सी. खारोडे



महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित कायदेविषयक कार्यशाळेत माहिती देतांना डॉ. वासुदेव भगत



दि. २६ ऑक्टोंबर २०१८ रोजी मतदार नांव नोंदणी जनजागृती कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना मा. तहसिलदार अतुल पातोळे

# संपादकीय

आमच्या महाविद्यालयाचा 'मोतीपुष्प' हा वार्षिकांक आपल्या हाती सोपवितांना मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयात कला शाखेतून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या तरुण हृदयांची स्पंदने, त्यांचे विचार व भावना यांना मोकळेपणाने व्यक्त व्हावे असे हे व्यासपीठ म्हणजे आमच्या महाविद्यालयाचा हा वार्षिक अंक होय.

साहित्याची निर्मितीप्रक्रिया ही जटील असते. युवा अवस्थेत विद्यार्थ्यांना कवितेतून व्यक्त होणे सोपे वाटते. परिणामी या अंकात कवितांची संख्या अधिक दिसेल. कवितांसोबतच हे विद्यार्थी थोर पुरुषांचे नव्याने चिंतन करून आपल्या लेखांमधून मांडतांना दिसतात. आई-वडिलांचे ऋण, शेतकऱ्यांची अवस्था, मैत्री, नातेसंबंध अशा विविध विषयांवर व्यक्त होणारी ही तरुणपिढी आहे. विद्यार्थ्यांसोबतच आमच्या महाविद्यालयातील संशोधक वृत्तीच्या प्राध्यापकांनी विविध विषयांवर आपले चिंतन मांडले आहे. असा हा सर्वांगसुंदर वार्षिकांक आपण जरूर वाचावा ही विनंती.

**-: संपादक मंडळ :-**

| | | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. एम. के. फडणीस | - | संपादक |
| प्रा. डॉ. ए. व्ही. वाहुरवाघ | - | उपसंपादक |
| प्रा. आर. एन. गावंडे | - | संपादन साहाय्य |
| कु. मुक्ता गजानन बजर बी.ए. भाग १ | - | संपादन साहाय्य |
| कु. रोशनी जयस्वाल बी.ए. भाग २ | - | संपादन साहाय्य |

---

प्रकाशक :- सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर
ता. बार्शिटाकळी, जि. अकोला.

छपाई :- 'प्रिंटवेल', मंगलदास मार्केट, अकोला.
(भ्रमणध्वनी : ९४२२८६१६१२)

---

* 'मोतीपुष्प' या वार्षिक अंकातील सर्व विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १) | प्राचार्यांचे मनोगत | डॉ. व्ही.सी. खारोडे | १ |
| २) | संत तुकारामांची साधक अवस्था | प्रा. डॉ. एम. के. फडणीस | ३ |
| ३) | अकोला जिल्ह्याचे वाङ्मयीन योगदान | प्रा. डॉ. अशोक व्ही. वाहुरवाघ | ६ |
| ४) | ज्ञान व्यवस्थापन : साधन व तंत्रे | प्रा. डॉ. रेखा एस. काळबांडे | ९ |
| ५) | म. गांधीची भारताच्या स्वातंत्र्यासाठी शस्त्रे | प्रा. एस. एम. मनवर | १२ |
| ६) | सर्वांगासन करा, थायरॉइडला दूर सारा | प्रा. नानासाहेब सपकाळ | १४ |
| ७) | आकाशक्षेप | श्री. भा. भ. महल्ले | १५ |
| ८) | Education | Prof. Ramkrishna N. Gawande | १६ |
| ९) | कौटिल्य यांचे आर्थिक विचार | प्रा. डॉ. पंकज मारोतीराव तायडे | १८ |
| १०) | क्षणचित्रे | --- | २७, २८, ३३ |
| ११) | संविधान जनजागृती सप्ताह | प्रा. डॉ. वासुदेव वा. भगत | २९ |
| १२) | शिक्षण अवस्था | प्रा. डॉ. अनिल के. ठाकरे | ३४ |
| १३) | महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव | दत्ता हनुमान सदाफळे | ३७ |
| १४) | राजकारण कितपत योग्य ? | कु. रोशनी जयस्वाल | ४० |
| १५) | आजची तरुणाई आहे कुठे ? | कु. मुक्ता गजानन बजर | ४२ |
| १६) | युगप्रवर्तक : शिवाजी महाराज | कु. अंजली उल्हास महल्ले | ४५ |
| १७) | आई - वडील | कु. रूपाली देवानंद मनवर | ४७ |
| १८) | भारत आणि जगातील विज्ञान, आम्ही कोठे आहोत ? | दत्ता हनुमान सदाफळे | ४९ |
| १९) | असे असावे घर, सुखी संसारचे रहस्य | श्री. भा. भ. महल्ले | ५२ |
| २०) | राष्ट्रीय सेवा योजना | ---- | ५८ |
| २१) | कृती कार्यक्रम - | तक्ता १, तक्ता २ | ६३ |
| २२) | कृती आराखडा | वार्षिक नियोजन | ६५ |
| २३) | विविध समित्या | समित्यांचा कारभार | ६७ |
| २४) | सामुदायिक प्रार्थना | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | ६९ |
| २५) | खरा तो एकचि धर्म | साने गुरूजी | ७० |
| २६) | गोष्ट, काव्यसुमने, शेरोशायरी व विनोदी साहित्य | | |

# महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव

दत्ता हनुमान सदाफळे
बी. ए.-भाग १

'' जय जय महाराष्ट्र माझा,
गर्जा महाराष्ट्र माझा ''

आपला देश भारत. त्यातलेच 'संताची भूमी' म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्य. प्रथम आपण या सांस्कृतिक वैभवाने नटलेल्या महाराष्ट्राची ओळख पाहू. क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसरा क्रमांक असलेले राज्य. राज्याचा बहुतांश भाग बेसाल्ट खडकांनी बनलेला आहे. सह्याद्री पर्वत, सातपुडा पर्वत, महाराष्ट्र पठार यांच्या कुशीत तापी, नर्मदा, गोदावरी, भीमा, कृष्णा नद्यांनी वेढलेले माझे राज्य. आपला राजवृक्ष आंबा तर राज्यप्राणी शेकरू. महाराष्ट्रात जंजिरा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, शिवनेरी, रायगड, सिंहगड, दौलताबाद किल्ले. अजिंठा, वेरूळ ह्या जगप्रसिद्ध लेणी आहेत व त्याचबरोबर लोणार सरोवरही आहे.

आता सांस्कृतिक वैभव असलेल्या सणांची ओळख करूया. आपला नववर्षारंभ होतो गुडीपाडव्याला. घराघरातून आपण गुढी उभारून नववर्षाचे स्वागत करतो. कडू-लिंबाचे महत्त्व त्यादिवशी असते.

नागपंचमीच्या सणाला शेतकऱ्यांचा मित्र असलेल्या नागोबाची आपण पूजा करतो. जणू प्राणीपूजा करून आपण त्यांचे उपकार मानतो.

नंतर वाजतगाजत येतो गणराज. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला हा उत्सव. सामाजिक एकतेचे प्रतिक आहे. गौरीपूजनाने वैभवाचे पूजन आपण करतो.

नंतर शमी-आपट्याची पानाचे सोने करणारा येतो दसरा. "दसरा नि आपसातील कटुभाव विसरा" असा संदेश देणारा सण. एकदा वृक्षाचे महत्त्व पटवून जातो.

फटाक्याच्या धूमधडाक्यात येते दिवाळी. अमावस्येचा अंधःकार दिव्यांनी उजळून निघतो. जणू अज्ञानाचा अंधार दिव्याच्या ज्ञानाने प्रकाशमान करा असा मोलाचा संदेश देणारा सण.

"तीळगुळ घ्या, गोडगोड बोला" असे सांगणारी संक्रांत येते. तीळ आणि गुळ त्या वातावरणाशी अनुरूप असतो. उत्तरायण सुरू होते. दिवस तिळातीळाने वाढतो असे पूर्वापार म्हटले जाते ते सार्थच वाटते. सर्वांशी प्रेमाने वागा असा संदेश देणारा हा सण.

नंतर येते होळी. अज्ञान, अंधश्रद्धेचे, भेदभावाचे, वाईट प्रथांचे दहन करा असा संदेश देते. हे आपले पारंपारिक सण. ह्या सणातून सर्व व्यवसायाला हातभार लागतो.

पुढे सांगायचे झाले तर:

"महाराष्ट्र भूमी संत-माऊलींची
पुण्यभूमी माझी. कृपादृष्टी त्यांची.
महाराष्ट्र सारा त्यांनी जागवला,

अंधारात दीप त्यांनी पेटवला.
संतांनी आम्हाला संतवाणी दिली,
अमृताची गोडी मराठीस आली."

महाराष्ट्राचे आराध्यदैवत विठूमाऊली. त्यांचेच तीर्थक्षेत्र असलेले पंढरपूर, ह्याच भूमीत आहे. तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव, सोपान मुक्ताबाई ह्यांच्या अभंगगाथा ह्याच मातीत रूजल्या-वाढल्या आहेत. कित्येकांचे कुलदैवत आई भवानी तुळजापूरात विराजमान आहे.

महाराष्ट्राचा मान असलेला शिवराया इथेच घडलेला आहे. किल्ल्यांच्या रूपात त्यांची साक्ष महाराष्ट्र देत उभा आहे, वीरगाथा गात आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी ह्यांच्या कविता खानदेशची ओळख करून देतात. सावित्रीबाई फुलेंनी स्त्री शक्तीला सुशिक्षित केले. बाळाची ओए हिरकणी देऊन जाते. अनेकांचे श्रद्धास्थान असलेले शेगाव श्री गजानन महाराजांचा मंत्र घुमवित आहे. साईबाबांचे साक्षात्कार करणारे शिर्डी इथेच आहे.

अभिनयाचे माहेरघर असणारे हॉलीवूड ... राजधानी मुंबईतच आहे.

पारंपारिकतेचे जतन करणारी खास महाराष्ट्र ... आपली आहे. परस्त्री मातेसमान मानणे असा ... शिवबा इथे उभे आहेत. शिक्षणाचे माहेरघर पुणे ह्याच ... आहे.

हा पारंपारिक वारसा आपण जतन करणे हे ... महाराष्ट्रवासीयाचे कर्तव्य आहे. स्त्रीशक्तीची ओळख ... देणाऱ्या देवी इथे आहेत. स्त्रीचा आदर करा हीच ही शि... आपल्याला मिळते.

प्रत्येक तीर्थक्षेत्राचं महत्त्व आपण राखायला ... आपसातील भेदभाव विसरून सांस्कृतिक वैभव पुढे ... हवे. एवढ्या मोठ्या बाबरी मशिद खटला सुनावणी... महाराष्ट्रभर शांतता होती, हे आपल्या सामंजस्याचं ... आपणास पाहायला मिळते.

१ मे या रोजी महाराष्ट्रभर 'महाराष्ट्र दिन' ... करून प्रत्येकजण महाराष्ट्राला वंदन करतो.

मंगल देशा ! पवित्र देशा !
महाराष्ट्र देशा !
प्रणाम घ्यावा माझा हा
श्री महाराष्ट्र देशा !
जय महाराष्ट्र !!

■ ■ ■

## ।। आई - वडील ।।

आई असूनी सर्व सुखे
लाभी जिवनी

कर मानवा आई-वडीलांची सेवा
आई-वडील हेच तुझे तिर्थ-यात्रा
आई-वडील हेच तुझे विश्व
कर मानवा आई-वडीलांच्या सेवेचे पालन
कर मानवा आई-वडीलांच्या आदराचे मान

हेच आई-वडील हेच सत्य मानवाचे ज्ञान
जिवंत परी खाऊ घाल त्यांना नानापरी
मग मेल्यावरी नका करू पंगतीला लाडू पुरी
जिवंत पणी कर तू सेवा त्यांची
मग मेल्यावर नको करू देवा देवा घरी

जिवंतपणी करतोस हेवा मग
मेल्यावर का करतोस देवा देवा
आम्हां मिळेल सर्व सुख जिवनी
पण आई-वडील पुन्हा नाही
हेची ठेवा ध्यानी मनी



कु. राधिका राजेश्वर सामुद्रे
बी. ए.- भाग १

## असं का ? बरं गं आई !

असं का ? बरं गं आई
तुलाच हे सर्व कष्ट
कितीही केले तरी का ग
होत नाही हे नष्ट,

कितीही मिळविले यश
तरी का ग म्हणतात अपयश
असं का ? बरं गं आई
तुलाच हे सर्व कष्ट

सर्व आयुष्य ग तुझे
कष्टातच गेले
कष्ट करूनी करूनी
घामातच तू झिजली
असं का ? बरं गं आई
तुलाच हे सर्व कष्ट

देव हा प्रत्येकाच्या घरी
जाऊ शकत नाही
म्हणूनच त त्याने दिली
देवरूपी ही आई
असं का ? बरं गं आई
तुलाच हे सर्व कष्ट

कु. राधिका राजेश्वर सामुद्रे
बी. ए.- भाग १



# राजकारण कितपत योग्य

कु. रोशनी जयस
बी. ए.-

फेब्रुवारी २०१९ मध्ये पुलवामामध्ये झालेला हल्ला एक हादसा होता है आपले राजकारणी म्हणतात तर ४२ SRPFचे जवान शहिद झाले हे कोण होते ?

Air strike नंतर तर काही राजकारणी नेते म्हणतात की, Air strike ने केवळ पाकिस्तानातील केवळ झाडे तुटले तर काही नेते म्हणतात की Air strike खरी असेल तर त्याचे काही पुरावे द्या, ज्याप्रमाणे अमेरिकेने ओसामा बीन लादेनला मारल्याचे पुरावे दाखवले होते. ह्या राजकारणी लोकांना पुरावे दाखवण्यासाठी का फोटोग्राफर घेऊन जायचे होते का ?

संपूर्ण जगात केवळ दोनच देश असे आहे की ते शत्रूच्या घरात जाऊन मारतात. ते म्हणजे UA आणि ईस्त्राईल. परंतु आता ह्या दोन देशामध्ये आपल्या भारताचे नावसुद्धा जोडल्या जात आहे. जगाने जरी भारताने केलेली Air strike मान्य केली असेल परंतु काही राजकारण्यांना पुरावे पा

भारतातील ह्या राजकारणामुळे आता पाकिस्तान म्हणतो की भारताच्या ह्या Air strike मुळे आमचे कोण आर्थिक व वित्तीय नुकसान झालेले नाही. केवळ आ झाडे पडली. भारताने आमच्या पर्यावरणाचा ऱ्हास के त्यामुळे आता तो संयुक्त राष्ट्रसंघामध्ये जाणार आहे.

आता Air strike चा तर सर्वच राजकीय पक्ष च्या निवडणुकीत फायदा घेण्याचा प्रयत्न करत आहे. कोणताही राजकीय नेता आणि राजकीय पक्ष पाकिस्तान आतंकवाद संपूर्णपणे संपवण्याची गोष्ट करीत असेच जर राजकारण भारतात सुरू असेल तर पु सारखे हल्ले रोजच होणार व रोजच नव्याने राजकारण होणार !



# क्षणचित्रे



प्राचार्य व्ही. सी. खारोडे सर, अध्यक्षीय भाषण करतांना




डॉ. पी.एम. नावडे उद्घाटनपर भाषण करतांना



वृक्ष लागवड करतांना प्राचार्य व्ही. सी. खारोडे, प्रा. रामकृष्ण गावंडे, प्रा. सुनील मनवर तसेच महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी



मातीबंधारा बांधतांना (रा.से.यो.) भेंडीमहाल येथे सहभागी





कृषी प्रदर्शनास (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला) भेट दि. २९ डिसेंबर २०१८

## राष्ट्रीय सेवा योजना

## ।। वर्ग प्रतिनिधी ।।



विक्की शंकरराव काकड

बी.ए. भाग - १



कु. भावना रविंद्र दोनोडे

बी.ए. भाग - २



सूरज दिलीप निलखन

बी.ए. भाग - ३

सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

- द्वारा संचालित -

नॅक, बंगलोर द्वारा थर्ड सायकल मानांकित महाविद्यालय, श्रेणी 'बी'

# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज

पिंजर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला (महाराष्ट्र)

**गट - बिगर व्यवसायिक ग्रामीण महाविद्यालय**




# मोतीपुष्प

## अंतर्गत गुणवत्ता हमी विशेषांक

सत्र २०२२-२०२३

# क्षणचित्रे



ग्रंथालय विभागा तर्फे आयोजित
पाककला व रांगोळी स्पर्धेत
निरीक्षण करतांना महाविद्यालयाचे
प्राचार्य डॉ. व्ही. सी. खारोडे
व ग्रंथपाल डॉ. रेखा काळबांडे




आंतर महाविद्यालयीन क्रॉस कन्ट्री
स्पर्धेत उपस्थित शारिरीक
शिक्षण संचालक
डॉ. नानासाहेब सपकाळ



शिवजयंती उत्सवात प्रमुख वक्ते व
माजी विद्यार्थी धीरज भड यांचा
सत्कार करतांना
डॉ. एम. के. फडणीस




राजस्थान येथील बॅडमिन्टन स्पर्धेत
क्रीडा अधिकारी या नात्याने उपस्थित
व खेळाडूंचे मार्गदर्शक
डॉ. नानासाहेब सपकाळ

# भूमिपुत्र गौरव व सत्कार उपक्रम



श्री भाऊरावकाका महल्ले
शेलू खुर्द



श्री दशरथसिंगजी राठोड
भेंडीमहाल



श्री गजाननराव घुमरे
बहिरखेड



श्री माणिकरावजी अंधारे
पिंपळगांव चांभारे



श्री गणेशरावजी महल्ले
शेलू खुर्द



श्री विजयभाऊ ताकरे
निहिदा, ह.मु. पिंजर



श्री मनिषबापू देशमुख
भेंडीमहाल



चि. अंकुशजी महल्ले
शेलू खुर्द

## महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र संशोधन मंडळाच्या अंतर्गत आचार्य पदवीसाठी संशोधन करणारे दोन संशोधक



प्रा. प्रकाश पांडुरंग गवई



प्रा. अमर तुकाराम धेर

# ।। महाविद्यालयाची अनमोल रत्ने ।।



**प्रा. डॉ. नितीन रमेश भिंगारे**
मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा



**प्रा. डॉ. पुरूषोत्तम रामराव थोटे**
जिजामाता आर्टस् कॉलेज, दारव्हा



**प्रा. डॉ. गणेश आत्माराम** ...
सरस्वती कला महाविद्यालय, द...



**श्री सचिन शांताराम धाडक**
पी.एस.आय.,नागपूर



**ॲड. श्री गणेश मनोहरराव गुजर**
कारंजा लाड



**ॲड. विनीत विनायक शिरसाट**
अकोला



**ॲड. केशव वासुदेव इंगोले**
अकोला

# संपादकीय

आमच्या उपरोक्त कला महाविद्यालयाचा हा **सतरावा वार्षिकांक** आपल्या हाती सोपवितांना कर्तव्यपूर्तीचे समाधान होत आहे. **'मोतीपुष्प'** या विशेष नामाने तो दरवर्षी आम्ही प्रकाशित करीत असतो. **सुशिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्व. भाऊसाहेब लहाने** यांचे **जन्मशताब्दी वर्ष** २२ जून २०२२ रोजी पूर्णोत्सवाने साजरे झाले. त्यानिमित्ताने स्व. भाऊसाहेबांच्या विचार व कार्याला उजाळा देणारा देखणा विशेषांक महाविद्यालयीने प्रकाशित केला. हेतू हा की, स्व. भाऊसाहेबांचे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आजच्या नवयुवकांना नवचेतना देणारे ठरेल.

स्व. भाऊसाहेब लहाने यांच्या दृष्टीसमोर वरिष्ठ महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास करून दर्जेदार उच्च शिक्षणाची सोय पिंजरमध्येच व्हावी हे स्वप्न होते. आमच्या सुदैवाने त्यांच्या डोळ्यांसमोरच हे स्वप्न पूर्ण झाले. काळ अनंत आहे. काळाच्या ओघात महाविद्यालयाच्या स्थापनेला पंचवीस वर्षे उलटून गेलीत. या पंचवीस वर्षात अनेक स्थित्यंतरे झालीत. इंटरनेटमुळे आजच्या जगाला खूपच गतीमान केले आहे. दूरशिक्षणाद्वारे अध्यापनाची गती विस्मयकारक वाढली आहे.

दरम्यान महाविद्यालयातील आम्हा सर्व प्राध्यापकांच्या हातून हजारो विद्यार्थी-विद्यार्थीनी पदवी प्राप्त करून विविध क्षेत्रात कार्यरत झालीत. मागे वळून पाहतांना मनात विचार येतो की, या हजारो विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी अर्थार्जनासह त्यांच्या जीवनात स्थिरावलीत. त्याचा निष्कर्ष असा निघतो की, काही शेकडो विद्यार्थी त्यांच्या कुटुंबातील पारंपरिक शेती व पूरक व्यवसाय सांभाळीत आहेत. काही विद्यार्थ्यांनी अन्य व्यवसाय निवडले व ते समाजात स्थिरपणे उभे राहिलेत. काही विद्यार्थ्यांनी शिक्षण घेता-घेता बलोपासनेवर भर दिला. परिणामी हे विद्यार्थी पोलीस खाते व सैन्यात विविध हुद्द्यांवर कर्तव्य बजावीत आहेत. तर पदव्युत्तर शिक्षण घेऊन काही विद्यार्थी व विद्यार्थीनी बँकेत व पोस्टात रुजू झालेत. त्यातीलच काही विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक व वकील झालेत. ही आमच्या महाविद्यालयाची जमेची बाजू आहे. उर्वरित विद्यार्थी या देशाचे आदर्श नागरिक आहेत. कारण शिक्षणाने त्यांच्यात विवेकीपणा व आदर्श मूल्यांचे संवर्धन करण्याचे कार्य आम्ही केले आहे. शिक्षणाने आलेला विवेकीपणा व उपजत बुद्धिकौशल्यांच्या जोरावर महाविद्यालयाचे निवडक विद्यार्थी समाजासमोर उत्तम वक्ते या बिरूदाने वावरत आहेत. याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान वाटतो.

सन २०२२-२३ चा वार्षिकांक आम्ही **'अंतर्गत गुणवत्ता हमी विशेषांक'** या शीर्षकाने प्रकाशित करतो आहे. गत सहा वर्षातील आमच्याच स्वयंमूल्यमापनाचे प्रतिबिंब या अंकात उमटले आहे. अर्थात हे स्वयंमूल्यमापन अत्यंत पारदर्शीपणे तुमच्यासमोर मांडत आहोत. **'मोतीपुष्प'** या वार्षिक अंकाची कल्पना त्याचे नियोजन व मांडणी तसेच अंतर्गत सजावट व काही नवे उपक्रम यांचे संपूर्ण श्रेय आमचे सन्माननीय प्राचार्य **डॉ. व्ही. सी. खारोडे सर** यांनाच जाते. प्राचार्यांच्या मनात सतत महाविद्यालयाच्या उत्कर्षाचा ध्यास असतो. या ध्यासाचे फळ म्हणजे हा या वर्षी प्रकाशित होणारा अंक होय. आम्ही निमित्तमात्र आहोत.

महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापकांनी, कार्यालयाने वेळेत सर्व माहिती उपलब्ध करून दिली, त्यांचे मी आभार मानतो. विद्यार्थी व विद्यार्थीनींनी या अंकासाठी सर्जनशील साहित्य पुरवून खारीचा वाटा उचलला आहे. हा वार्षिकांक आम्ही **स्व. डॉ. अनिल ठाकरे सर** (समाजशास्त्र विभाग प्रमुख) यांच्या पावन स्मृतींना साश्रू नयनांनी व दु:खयुक्त अंत:करणाने समर्पित करीत आहोत.


■ **संपादक मंडळ** :- **डॉ. एम. के. फडणीस**   **डॉ. ए. व्ही. वाहुरवाघ**
**प्रा. आर. एन. गावंडे**   **कु. तेजस्विनी महल्ले** (वि. प्रतिनिधी)

■ **प्रकाशक** :- **सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर** ता. बार्शिटाकळी जि. अकोला.

■ **मुद्रक** :- **'प्रिंटवेल', मंगलदास मार्केट, अकोला. (भ्रमणध्वनी : ९४२२८६१६१२)**


* **'मोतीपुष्प'** या वार्षिक अंकातील सर्व विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | संपादकीय | | I |
| १) | प्राचार्यांचे मनोगत | डॉ. व्ही.सी. खारोडे | १ |
| २) | 'कमोदीनी काय जाणी तो परिमळ' | श्री. मोहनराव देशपांडे | ३ |
| ३) | प्रसिद्धी पासून कोसोदूर असलेली समाज सेविका माझी आई... | ॲड. श्रीदेवी साबळे | ५ |
| ४) | कोरोना नंतरच्या काळातील रोजगार स्थिती | डॉ. व्ही.सी. खारोडे | ९ |
| ५) | घटनाकार व प्रबोधनकार (अहवाल/निकाल) | डॉ. वासुदेव भगत | १२ |
| ६) | Advantage & Disadvantage.. (अहवाल/निकाल) | डॉ.. रामकृष्ण एन. गावंडे | २६ |
| ७) | श्री ज्ञानेश्वरीतील मोक्ष संन्यास योग (अहवाल/निकाल) | डॉ. एम. के.फडणीस | ३५ |
| ८) | श्री शिवकालीन कृषि जीवन (अहवाल/निकाल) | प्रा. एस. एम. मनवर | ५३ |
| ९) | आनंदाचा निर्देशांक (अहवाल/निकाल) | डॉ. पी. एम. तायडे | ६० |
| १०) | महापुरुषांच्या स्वप्नातील गाव (अहवाल/निकाल) | डॉ. अशोक व्ही. बाहुरवाघ | ७३ |
| ११) | आरोग्यसंपन्न जीवनासाठी योगसाधना (अहवाल/निकाल) | डॉ. एन. बी. सपकाळ | ९२ |
| १२) | स्त्री सक्षमीकरण ..... (ग्रंथालयाचा अहवाल) | डॉ. रेखाताई काळबांडे | १०३ |
| १३) | स्वामी विवेकानंद | श्री. भा. भ. महल्ले | ११४ |
| १४) | माजी विद्यार्थी संघटना | (यादी) | ११५ |
| | महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या लेख, कविता व सुविचार | (ललित) | ११६ ते १३४ |
| १५) | छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य धोरण | कु. ऐश्वर्या देशमुख | ११७ |
| १६) | स्वतः रडले पण.... चार्ली चॅप्लीन | कु. शुभांगी काकड | ११८ |
| १७) | एवढं तरी करावं / मराठी मुलगी | कु. ऐश्वर्या देशमुख / कु. प्राजक्ता गावंडे | ११९ |
| १८) | पक्षपुटीमुळे मानवी मूल्ये ऱ्हास होतात | कु. साक्षी भिंगारे | १२० |
| १९) | आई / जीवलग | कु. ऐश्वर्या देशमुख | १२२ |
| २०) | बाप / माझी आई | कु. तेजस्विनी महल्ले/कु. पल्लवी काळदाते | १२३ |
| २१) | एका बापाने | कु. अमृता गजानन हातोलकर | १२४ |
| २२) | बाप / माय | कु. गायत्री भगत / कु. गायत्री हांडे | १२५ |
| २३) | पाठीशी कृष्ण हवा / दुर्दम्य | कु. गायत्री प्रभाकर माळकर | १२६ |
| २४) | राजकारणीय सत्ता | कु. तेजल पूर्णाजी सोनोने | १२७ |
| २५) | मुलीचे शिक्षण प्रगतीचे लक्षण | कु. तेजस्विनी उ. महल्ले | १२८ |
| २६) | जगाचा पोशिंदा / शब्दरूपी पुष्प | कु. तेजस्विनी महल्ले / कु. अंजली सराटे | १२९ |
| २७) | मन म्हणजे नेमकं काय असतं ? / परिवर्तन | कु. रुषिका दंदी / कु. अंजली सराटे | १३० |
| २८) | माझी आई | कु. नलिनी धुरदव | १३१ |
| २९) | मैत्री / सुविचार संग्रह | हरीओम वसंता इंगोले | १३३ |
| ३०) | मेरा सपना और बदलती हुई जिंदगी / जीवन ने सिखाया | कु. शुभांगी कैलास काकड | १३४ |
| ३१) | वह बचपन के दिन / भाऊ | कु. रुषिका संजय दंदी | १३५ |
| ३२) | राष्ट्रीय सेवा योजना | अहवाल | १३६ |
| ३३) | विविध समित्यांचा कार्यभार | | १४१ |
| ३४) | जातीनिहाय प्रवेशित विद्यार्थी | तक्ता | १४३ |
| ३५) | Action Plan | | १४४ |
| ३६) | महाविद्यालय विकास समिती | | १४७ |
| ३७) | सार्वजनिक सुरक्षा | यादी | १४८ |
| ३८) | खरा तो एकचि धर्म | साने गुरुजी | १४९ |
| ३९) | प्रार्थनाष्टक | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | १५० |



# छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य धोरण

**कु. ऐश्वर्या प्रमोदराव देशमुख**
बी. ए. भाग १

शिवजन्माला जवळ जवळ चारशे वर्षे होत आली आहेत. तरी त्यांच्या पुण्यस्मरणात अंतर पडत नाही. हे सारे आजही का घडते ? मराठा साम्राज्याचे ते संस्थापक होते म्हणून ? की पन्नास वर्षाच्या आपल्या आयुष्यात त्यांनी अनेक लढाया केल्या आणि जिंकल्या म्हणून ? त्यांनी अफजलखानास ठार मारलं, शाहिस्तेखानाची बोटं कापली, पन्हाळ्यावरून स्वतःची शिताफीनं सुटका करून घेतली.

सर्वप्रथम एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे हिंदवी स्वराज्य होते. ते केवळ हिंदूचे स्वराज्य नव्हते. त्यात हिंदू धर्मासोबत अन्य सर्व धर्माचा समावेश होता. त्यामुळे त्यांचा कुणी हिंदू म्हणून उपयोग करून घेत असेल तर तो त्यांच्या विशाल व्यक्तिमत्वाला सीमा घालणारा ठरेल. महाराजांच्या स्वराज्याचा ध्वज केशरी होता, केशरी रंग शौर्य, समर्पण आणि त्याग यांची ओळख करून देणारा आहे. सोळाव्या शतकात इस्लामी राजवट होती. तिथे माणूस आणि मानवी मूल्ये यांना किंमत नव्हती. पण छत्रपतींच्या स्वराज्यात माणूस मोलाचा झाला. त्याच्या कल्याणाचा विचार प्रमुख होता. महाराजांचे प्रशासन हे सर्व जाती जमाती व विविध धर्म संप्रदायांचा सलोखा कायम राखणारे होते. त्यांच्या प्रशासनात केवळ नियम नव्हते तर त्याचे आचरणही होते. राज्यातील प्रजा त्यांचे सर्वस्व होते. त्यांना जगदीश्वर प्रजेत दिसायचा. स्वराज्याची संकल्पना सर्व संग्राहक, सहिष्णू, उदार आणि सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या लोकशाही व्यवस्थेस पूरक होती.



त्यांनी स्वतःची चलन-व्यवस्था अंमलात आणली होती. शिवराई हे तांब्याचे नाणे होते, तर काही सोन्याची नाणी होती.

**''स्थापूनी हिंदवी स्वराज्य आपुले, शौर्याने लिहिली इतिहास गाथा**
**असा हा जाणता राजा माझा, तयाच्या चरणी झुकविते माथा ।।''**

सामाजिक क्षेत्रात शिवाजी महाराजांचे काम लक्षणीय होते. वृक्षसंवर्धन, रस्तेबांधणी, ग्रामविकास यासाठी ते दक्ष होते. कलावंतांचा योग्य सन्मान त्यांच्या राज्यात होत असे. शिवबा कल्याणकारी राजे होते. आजच्या काळात शिवाजी महाराजांचे स्मरण खऱ्या अर्थाने कालसापेक्ष ठरेल आणि त्यांची स्वराज्याची संकल्पना मूर्तरूप धारण करील याचा विश्वास वाटतो.

**''शब्दही पडती अपुरे, अशी शिवरायांची किर्ती ।**
**राजा शोभूनी दिसे जगती, अवघ्या जगाचा शिवछत्रपती ।।''**



■ ■ ■



# स्वत: रडले पण लोकांना हसविले असा तो चार्ली चॅप्लीन



**कु. शुभांगी कैलास काकड**
बी. ए. भाग २

समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर जरी हास्य असेल पण त्या हास्यावरून हे कधीच सिद्ध होत नाही की, ती व्यक्ती आनंदी आहे. कारण अनेकदा शांत दिसणारा समुद्रच खूप खोल असतो.

चार्ली चॅप्लीन म्हणतात, या दुष्ट जगात काहीही कायमस्वरूपी नाही.आपल्यावर आलेली संकटे सुद्धा नाही. मला माझ्या आयुयात अनेक समस्या आहेत. पण माझ्या ओठांना ते माहित नाही, ते नेहमी हसत असतात. कृती शिवाय कल्पनाशक्तीला काहीही अर्थ नाही.आपण खूप जास्त विचार करतो आणि खूपच कमी अनुभवतो. चार्ली चॅप्लीनने कलापथकात छोटीशी भूमिका साकारायची हा त्याचा रोजचाच उद्योग होता. यामधून लोकांची थोडीफार मने जिंकता तर येत होती: पण पोट मात्र भरत नव्हतं.

तुमच्यापुढे जर प्रश्न निर्माण होत असेल तर उत्तर आपोआप सापडते, तेच झालं. त्या तरुणाला सुद्धा एका नाटक कंपनीत प्रवेश मिळाला आणि पाहता-पाहता हा हाडाचा कलाकार लोकप्रिय ठरू लागला. जीवनभर दुःखांचे ओझे वाहणाऱ्या चार्लीच्या जीवनात प्रसिद्धी आणि यशानंतरही समीकरण बदलली नाहीत. त्याच्या जीवनात खूप दुःखे आली. चार्ली चॅप्लीन यांचा तीन वेळा घटस्फोट झाला. आता 'संसार' या शब्दावरून चार्लीचा विश्वास उडाला होता.

**"खरोखर मनापासून हसायचे असेल तर तुम्हाला तुमच्या दुःखासोबत खेळता आले पाहिजे."** तेच चार्ली चॅप्लीनने केले. ते म्हणतात, "मला नेहमी पावसात चालायला आवडते. कारण त्यामुळे कोणी मला रडतांना ओळखू शकत नाही. आरसा हा माझा सर्वात चांगला मित्र आहे. कारण जेव्हा मी रडतो तेव्हा तो कधीच हसत नाही. यंत्रसामग्रीपेक्षा आपल्याला मानवतेची जास्त आवश्यकता आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये महानता असते. आयुष्यात एकदा तरी 'स्व'बद्दल विचार करा अन्यथा आपण या जगातील सर्वोत्तम विनोद गमावू शकता. काळ हा सर्वोत्कृष्ट लेखक आहे. तो नेहमी परिपूर्ण शेवट लिहितो.

चार्ली चॅप्लीन म्हणतात, "हास्याविना दिवस घालवणे म्हणजे दिवस व्यर्थ घालवणे. आपले दुःख एखाद्यास हसवू शकते परंतु आपल्या हास्याने कोणालाही दुःख होऊ देऊ नका. मी कधीही कसा दिसतोय? स्वतःसोबत काय करतोय ? याविषयी असुरक्षित झालो नाही. माझ्या आईने मला नेहमी इतरांसाठी नव्हे तर स्वतःसाठीच गोष्टी करण्यास सांगितले." ते म्हणतात, "जेव्हा तुम्ही दुःखी असता तेव्हा जीवन तुमच्यावर हसते. तुम्ही जेव्हा आनंदी होता तेव्हा आयुष्य तुमच्याकडे बघून हसते. परंतु जेव्हा आपण इतरांना आनंदित करतो तेव्हा जीवन तुम्हाला सलाम करीत असते. **असा हा चार्ली चॅप्लीन जगात अजरामर ठरला.**

# पक्षफुटीमुळे मानवी मूल्ये ऱ्हास होतात

कु. साक्षी भिंगारे
बी. ए. भाग ३

**'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास और सबका सहयोग'**
अशा प्रकारे पक्ष हा देशातील सर्वोच्च सांसदीय प्रणालीमध्ये सत्तारूढ होतो आणि अशातच पक्षामध्ये वैचारिक, राजकीय वा सामाजिक असे भेद निर्माण होऊन पक्षामध्ये फूट निर्माण झाली; तर मग आपण आपल्या देशाचा विकास कसा साध्य करायचा ? ज्या लोकांनी विश्वास ठेवून लोक प्रतिनिधींना निवडून दिले, तेच प्रतिनिधी जर मतभेदांमध्ये वेळ घालवतील तर मग देशाचे भवितव्य तरी काय असेल ?




स्वातंत्र्यानंतरच्या काळात वैचारिक बैठक असलेले संयमी, राजकारणी संघटीतपणे स्वार्थाकडे दुर्लक्ष करून सत्ता, संपत्ती, पद यांच्या पलीकडे जाऊन पक्ष व संघटनेत कार्यरत राहायचे. पण जसा काळ पुढे गेला तसे साम, दाम, दंड, भेद या नीतीचा वापर करून अधिकारांच्या माध्यमातून सत्तासंघर्ष वाढत गेला. कित्येकदा मोठ्या पक्षांना थोडेसे सदस्य एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाऊन सत्तेपासून दूर ठेवायला लागलेत. म्हणून किमान १/३ ते २/३ पर्यंत लोकांच्या सदस्य संख्येशिवाय बाहेर पडता येणार नाही, हा कायदा करण्यात आला. ज्याला आपण **'पक्षांतर बंदी'** कायदा म्हणून ओळखतो.

राजकीय नेतृत्व आपल्या लोकांपुरते, राज्यांपुरते मर्यादित होऊन निवडून यायला लागले. त्यांनी जात, धर्म, भाषा यांच्या अस्मिता जागृत केल्या व वंशवादातून मर्यादित वैचारिक पातळीने ते राज्यकर्ते झालेत. कालांतराने हे नेतृत्व थिटे पडायला लागले. इतर कार्यकर्त्यांच्या अपेक्षांना अनैतिक मार्गाचे स्वप्न पडायला लागले. कदाचित मूळच्या विचारधारांना मनात घेऊन नेतृत्व जन्माला आले. त्यांनी कदाचित पुढे चालून त्या मूळ वैचारिक पातळीलाच तिलांजली दिली. म्हणून नेते, कार्यकर्त विस्कळीत व्हायला लागले. बाहेरच्या जगात प्रचंड पैशाचा, संपत्तीचा, सत्तेचा ओघ वाहतो आहे.

आपल्या बळावर आपलेच नेते मजा मारत आहेत. यामधून पुढे पक्षफुटीला चालना मिळायला लागली. अगोदर लहान-लहान राज्यांतील सत्तेचे बदल, त्यातून मोठ्या प्रगत राज्यांमध्ये हे वारे वाहू लागले आणि त्यातून राजकीय फुटीचे दरवाजे उघडल्या गेलेत.

अगोदरच्या काळात सत्ताधाऱ्यांच्या एखाद्या निर्णयाला जगाच्या समोर विरोधी नेता पडू देत नव्हता. आता मत मिळविण्यासाठी स्वार्थी नेते, काही संघटना

जनतेच्या समोर आपल्याच सत्ताधाऱ्यांना खोटं ठरविण्याचा प्रयत्न करत आहे. त्यात प्रचंड भ्रष्टाचार हा राजकीय नेत्यांच्या माध्यमातून सुरू झाल्यामुळे जो तो नेता स्वतःला स्वच्छ ठरविण्याच्या नादात आपल्याच विरोधी नेत्यांना उघडे पाडत आहे. तेथूनच या राजकीय लोकांच्या वागण्याला समाज उघड्या डोळ्यांनी पाहतो आहे.

"लोका सांगे ब्रम्हज्ञान परंतु स्वत: कोरडे पाषाण" या उक्तीप्रमाणे राजकीय पक्षातील नेते वागायला लागलेत. परंतु जनता सूज्ञ व शहाणी असते. पक्षांतर केलेल्या लोकप्रतिनिधींना जनता मतपेटीतून विरोध दर्शवून त्यांचा निवडणूकीत पराभव करत असते. कारण पक्षफुटी म्हणजे राजकीय मूल्यांना फासावर चढविणे व स्वत:च्या स्वार्थासाठी हेच राजकीय लोकप्रतिनिधी जनमताचा अपमान करीत असतात.

आत्ताच आपण महाराष्ट्राचे उदाहरण घेतले तर आपल्या लक्षात येते की, पक्षफुटीमुळे पक्षाचे महत्व कमी होत आहे.

काही क्षणांसाठी आपण म्हणू की, पक्षप्रमुख त्यांच्या पक्षाच्या विचारसरणीपासून काही काळासाठी दूर जात आहेत. म्हणून काय त्यांच्या पाठीत खंजीर खुपसणे किंवा पक्षफूट करणे हा उपाय आहे ? तर नाही. लोकशाहीच्या मार्गाने त्यांच्यावर दबाव आणू शकले असते, असं नाही की त्यांच्याकडे उपायच नव्हता, त्यांनी समन्वय न घडवून आणल्यामुळे सुद्धा राजकीय मूल्यांचा ऱ्हासच झाला ....

**कसलं समाजकार्य, कसला विकास,**
**तुम्ही तर भरायची तुमचीच पोटं ...**
**कसला हमीभाव, कसला रोजगार**
**असं अजून किती दिवस बोलणार तुम्ही खोटं ...**

सामान्यांची आशा त्या पक्षापोटी असलेले प्रेम हे कुठंतरी दगावल्या जात आहे. म्हणजे बघा, जेव्हा भारतामध्ये एखादा पक्ष हा सत्तारूढ होतो तेव्हा तो पक्ष केवळ पक्षच नसून भारतीय जनतेच्या माध्यमातून निवडून दिलेले एक प्रकारचे प्रतिनिधीत्वच नाही का ? **'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास और सबका सहयोग'** अशा प्रकारे पक्ष हा देशातील सर्वोच्च सांसदीय प्रणालीमध्ये सत्तारूढ होतो आणि अशातच पक्षामध्ये वैचारिक, राजकीय वा सामाजिक असे भेद निर्माण होऊन पक्षामध्ये फूट निर्माण झाली; तर मग आपण आपल्या देशाचा विकास कसा साध्य करायचा ? ज्या लोकांनी विश्वास ठेवून लोक प्रतिनिधींना निवडून दिले, तेच प्रतिनिधी जर मतभेदांमध्ये वेळ घालवतील तर मग देशाचे भवितव्य तरी काय असेल ?

**सामान्य जनता फसते.... बिचारी**
**गरिबाचं होत मरण ... !**
**सत्तेचा सारीपाट मांडून नेते करतात उदरभरण**
**खोट्या थापा, खोटी आश्वासने ठेवतात**
**आपल्याकडे तारण .... ।**
**चालू जमान्यातल्या, चालूगिरीला सारेच म्हणतात**
**राजकारण ! ... राजकारण ! .... राजकारण !**

## बाप ....



शेतामधी माझी खोप
तिला बोराटीची झाप
तिथ राबतो कष्टतो
माझा शेतकरी बाप

लेतो अंगावर चिंध्या
खातो मिरची भाकर
काढी ऊसाची पाचट
जगा मिळाया साखर
काटा त्याच्याच का पायी
त्यानं काय केलं पाप ?

माझा बाप शेतकरी
उभ्या जगाचा पोशिंदा
त्याच्या भाळी लिहिलेला
रातंदिस कामधंदा
कष्ट सारे त्याच्या हाती
दुसऱ्याच्या हाती माप

बाप फोडतो लाकडं
माय पेटविते चुल्हा
पिठामागल्या घामाची
काय चव सांगू तुला
आम्ही कष्टाचंच खातो
जग करी हापाहाप



**कु. तेजस्विनी उल्हास महल्ले**
बी. ए.- भाग ३

## माझी आई ....



गर्भाशयात असताना नऊ
महिने तिने पोटात वागवलं
अवघडलेल्या काळामध्ये
स्वतःला रात्रंदिन वागवलं..

जन्म दिला जेव्हा तिने मला
उदरात अनंत कळा सोसून
माहिती नाही इतकी तिला
सहनशक्ती मिळाली कोठून ?

भूक लागली आहे मला हे
ती पटकन कशी ओळखते ?
हातपाय धुवून येईपर्यंत
जेवण पाट तयार करते ..

उशीर झाला घरी यायला
तर काळजी तिला असते
सगळे झोपी गेले तरी ती
मात्र वाट पाहत बसते ..

एवढे कष्ट करते म्हणून
एक सेल्फी घ्यावी म्हटलं
"चांगले फोटो येत नाही!"
म्हणत मलाच तिनं दाटलं ..



**संकलक :-**
**कु. पल्लवी त्र्यं. काळदाते**
बी. ए.- भाग २

## एका बापाने आपल्या मुलीसाठी व्यक्त केलेले मनोगत....

नाही ऐकली मी किलकारी
तुझ्या रडण्याची
करत होतो तेव्हा तयारी
हॉस्पिटलच्या बिलाची....
जन्माला येताच तू समजू लागलो मी
स्वतःला राजा
तेव्हापासून भविष्याची चिंता
खालवत होती तुझ्या....
हळूहळू चिमणी माझी
मोठी होऊ लागली
या बापाच्या खांद्यावरती
जबाबदारी आता वाढली...
मोठ्या शिक्षणासाठी पाठवायचे
होते तुला शहराला
पैसा जपून ठेवण्यासाठी
ठिगळं लावली मी कापडाला...
संस्कार चांगले देण्यासाठी
कठोर मी झालो
तुझ्यावरचे प्रेम गटकन
मी प्यायलो ...



शिक्षण पूर्ण होताच लागली
तुझ्या लग्नाची घाई
राजकुमार शोधा माझ्या लेकीला
म्हणू लागली तुझी आई ...
एक एक पैसा जोडला
मी तुझ्या लग्नाला
कमी नको काही पडायला म्हणून
हात जोडले मी सावकाराला ...
कन्यादान करण्याचे आज
भाग्य लाभले मला
आयुष्यभर सुखी राहो
हाच आशीर्वाद तुला ...
लग्नमंडपात तुझ्या
डोळे माझे पाणावले
पाठवणीला जेव्हा तुला
दुसऱ्याच्या हाती सोपवले ...
विसरणार तर नाही ना कधी तू पोरी
या गरीब बापाला
येशील ना तू धाऊन माझ्या
शेवटच्या हाकेला ....
शेवटच्या हाकेला ....





संकलक :-
**कु. अमृता गजानन हातोलकर**
बी. ए.- भाग ३



# मुलीचे शिक्षण प्रगतीचे लक्षण

कु. तेजस्विनी उ. महल्ले
बी. ए. भाग ३

स्त्री शिक्षणाचे महत्व ज्योतीबा फुलेंनी दीडशे वर्षांपूर्वी ओळखले होते. १८४८ मध्ये पहिली मुलींची शाळा सुरू केली. सावित्रीबाईंना शिक्षीत करुन त्यांना शाळा चालवायला दिली. महर्षी कर्वे यांनी शैक्षणिक क्षेत्रात किती आणि काय कार्य केले ते सर्वांना माहिती आहे. मुली शिक्षाबरोबरच खेळामध्येही प्राविण्य मिळवत आहेत. आताच झालेल्या टोकीयो ऑलीम्पीक मध्ये महिला हॉकी संघ असेल किंवा पी.व्ही. सिंधू असेल आपण त्यांचा खेळ पाहिला आहे. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने भारत देशाचा झेंडा रोवला आहे. त्यांचे प्रयत्न आणि मेहनत कामी आली.

**'मुलगी शिकली, प्रगती झाली'**

हे बोधवाक्य नेहमी वाचतो.

मुलींच्या शिक्षणाने समाज सुधारतो. एक शिकलेली मुलगी मोठेपणी सर्व कुटूंब सुशिक्षीत करते. स्त्री कुटुंबाचा आस असते पूर्ण कुटूंब तिच्या भोवती फिरत असते. शिक्षणच स्त्री उद्धाराचे व समाज परिवर्तनाचे साधन आहे. म्हणून मुलींना शिक्षण देणे फार गरजेचे आहे. एक आई आपल्या मुलाचा जसा अभ्यास घेईल तसा कोणत्याही शिकवणी वर्गात घेतला जाऊ शकत नाही. कारण सुशिक्षीत आई अभ्यासाबरोबर चांगले वागणे, प्रामाणिकपणा असे चांगले संस्कार मुलांवर घडवते. पुस्तकी ज्ञानाबरोबर समाजात वावरण्याचे धडे मुलांना तिच्याकडून मिळतात. राजमाता जिजाऊंमुळे छत्रपती शिवाजी महाराज घडले आणि स्वराज्य निर्माण झाले. सगळ्याच दृष्टीने सशक्त पिढी एक स्त्री तयार करते. शिवाय शिक्षणामुळे स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य मिळते.

आजही देशाच्या अनेक ठिकाणी 'मुलांपेक्षा' मुलगी बरी, दिवा लावते दोन्ही घरी, सुखी संसाराचे एकच सूत्र, कन्येलाच मानू पूत्र, मुलगी शिकली प्रगती झाली, यासारख्या स्त्रीभ्रूण हत्येविरोधी तसेच स्त्री शिक्षणाविषयीच्या घोषणा देत जनजागृती केली जात आहे. कोणत्याही क्षेत्रातील शिक्षणाचा उपयोग मुली कुटुंबासाठी करतात, म्हणून मुली जगवा, त्यांना शिकवा, सर्वांची प्रगती करा.

**मुलगी झाली म्हणून डोळ्यात आणू नका पाणी**
**शिक्षण देऊन बनवा तिला झाशीची राणी ।।**

स्वातंत्र्यपूर्व काळात मुलींना शिक्षण देणे म्हणजे एक प्रकारचे पाप समजायचे. चूल आणि मूल यातच तिला गुरफटून ठेवायचे. याचा काय परिणाम झाला ? समाजात अंधश्रद्धा आणि अज्ञान वाढतच गेले. आता तरी मुलगी शिकवा सर्वांचा विकास होईल.

**सोडून द्या वाईट चालिरीती**
**आता मुलीच्या शिक्षणाला द्या गती ।।**

# क्षणचित्रे



पाककला व रांगोळी स्पर्धेत प्रमाणपत्र वितरण करतांना प्राचार्य डॉ. व्ही. सी. खारोडे



महाविद्यालयात दि. २५ फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यातील सुखद क्षणचित्र




पाककला व रांगोळी स्पर्धेत विजेत्या कु.तेजल सोनोने या विद्यार्थीनीस स्पर्धा परिक्षेसाठी उपयुक्त पुस्तक देतांना ग्रंथपाल डॉ. रेखा काळबांडे



तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करतांना डॉ. व्ही. सी. खारोडे व सोबत डॉ. नानासाहेब सपकाळ मुख्याध्यापक नांदे सर, श्री गिरी सर




राज्यशास्त्र विभागातर्फे डॉ. वासुदेव भगत सर यांनी आयोजित केलेल्या मतदार जनजागृती रॅलीचा क्षण




राष्ट्रीय सेवा योजने तर्फे स्वयंसेवकांनी शिबीरा दरम्यान श्रमदानातून बांधलेला बंधारा

**Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College,**

**Pinjar Dist Akola**

## Report on

**'Lokmanya Tilak Death Anniversary and**

**Lokshahir Annabhau Sathe Birth Anniversary'**

On dated 1 August , 2022 Lokmanya Tilak Death Anniversary and Lokshahir Annabhau Sathe Birth Anniversary program was organised in the college at Dnyanranjan Sabhagruh by the Department of National Service Scheme. Dr Wasudev Bhagat, Head Department of Political Science presided the function and Dr Manoj Phadnis, Head Department of Marathi was the chief guest of the function. The students from B A part 1, 2nd year and final in large numbers delivered the speech on the life of Lokshahir Annabhau Sathe and Lokmanya Bal Gangadhar Tilak. First of all the guest worshipped the images of Annabhau Sathe and Lokmanya Tilak and offered garlands to them. the guest speaker Dr Manoj Phadnis in speech through light upon the life of Annabhau Sathe and Lokmanya Tilak. Prof Ramkrushna Gawande the program officer of NSS conducted the program successfully and doctor Rekha kande lady program officer of NSS expressed vote of thanks.

Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College P. I.'R Dist.Akola

Programme Officer
National Service Scheme
Bhausaheb Lahane
Dnyanprakash Arts Collage Pinjar

**Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College,**
**Pinjar Dist. Akola**

**NOTICE**

All the students are informed that National Service Scheme is organising Lokmanya Tilak Death Anniversary and Annabhau Sathe Birth Anniversary on dated first of August 2022. On this occasion an Elocution Competition is organized. Those students who wanted to deliver their speech should prepare and come on time for the Elocution Competition.Kindly noted.

**Date** - 24 July, 2022

Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College P. I.'R Dist.Akola

**Program Officer**

Programme Officer
National Service Scheme
Bhausaheb Lahane
Dnyanprakash Arts Collage Pinjar

epaper.tarunbharat.net

# भाऊसाहेब लहाने महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

◆ **पिंजर, ३ ऑगस्ट**

येथील भाऊसाहेब लहाने महाविद्यालयात सोमवार, २ ऑगस्ट रोजी लो. टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत 'कोरोनाची भीषणता' या विषयावर शासकीय कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करून वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित प्राचार्य व प्राध्यापकवृंद

या स्पर्धेला बहुतांशी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही.सी. खारोडे यांनी अध्यक्षपद भूषविले तर डॉ. वासुदेव भगत व ग्रंथपाल डॉ. रेखा काळबांडे प्रमुख अतिथी होते. कार्यक्रमाची सुरूवात लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमा पूजन व हारार्पण करून झाली. अतिथी डॉ. भगत यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्याचबरोबर कोरोना कसा रोखता येईल, कोरोनासोबत कसे यशस्वी जगता येईल, या विषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. खारोडे यांनी मार्गदर्शन केले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. अनिल ठाकरे व डॉ. मनोज फडणीस यांनी केले. राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. रामकृष्ण गावंडे यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करून प्रास्ताविक केले. संचालन बी.ए.ची विद्यार्थिनी राधिका सामुद्रे हिने तर आभार राहुल सावंत याने मानले.

कार्यक्रमाला डॉ. अशोक वाहुरवाघ, डॉ. पंकज तायडे, डॉ. नानासाहेब सपकाळ, प्रा. सुनील मनवर, देवानंद बाकल, यादवराव देशमुख, संतोष गिरी, गंगाराम वानखेडे, श्यामपंत खापर्डे, गोपाल घुमसे उपस्थित होते. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web Pvt Ltd

Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College P. I. R Dist. Akola

# राष्ट्रीय सेवा योजना

B.L.D. arts collage Pinjar दि-१/८/२०२२

लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे जयंती

पुण्यतिथी Date - 1/8/2022

## उपस्थित विद्यार्थी- विद्यार्थीनी

| अ.क्र. | स्वयंसेवकाचे नाव | वर्ग | सही |
|---|---|---|---|
| 1 | कु: रिना बाबु चव्हाण | B.A. III | BChauhan |
| 2 | कु: रेणुका गणेश बोळे | B.A. III | R.G.Bole |
| 3 | कु: सुषमा साहेबराव राठोड | B.A. III | SRathod |
| 4 | कु: ज्योती प्रेमदास राठोड | B.A. III | J.A.Rathod |
| 5 | कु. जयश्री अशोक राठोड | B.A. II | Rathod |
| 6 | कु. माधुरी वामन झाकनवाड | B.A. I | M.W.Zakanwad |
| 7 | कु. अंकिता आत्माराम पवार | B.A. I | S.A.Pawar |
| 8 | कु. निकिता दत्तात्रय ठाकरे | B.A. II | DThakare |
| 9 | कु. राणी बाबाराव बोरखडे | B.A. II | R.B.Borkhade |
| 10 | कु. शेराली संजय जयस्वाल | B.A. II | Jaiswal |
| 11 | कु. प्रियंका सुरेश वानखडे | B.A. III | PWankhade |
| 12 | कु. आरती अशोक सुरडकर | B.A. III | Surdkar |
| 13 | कु. प्रणाली साहेबराव चांभारे | B.A. II | P.S.Chambhare |
| 14 | कु. वैष्णवी ज्ञानेश्वर अंभोरे | B.A. III | Ambhore |
| 15 | कु. माधुरी नारायण सोनोने | B.A. I | MSonone |
| 16 | कु. राधिका राजेश्वर सामुद्रे | B.A. I | R.Samudre |
| 17 | कु. अर्चना पांडुरंग मोहिते | B.A. I | Archana Mohite |
| 18 | कु. दामिनी सं. मुळे | BA I | |
| 19 | कु. योगिनी अ. कातसे | BA I | Katsare |
| 20 | कु. साधना सु. वानखेडकर | BA I | S.Wankhedkar |
| 21 | कु. अश्विनी ना. राठोड | BA I | ARathod |
| 22 | कु. मयुरी दि. लोखंडे | BA I | MLokhande |
| 23 | कु. गायत्री म. काळे | BA I | GKale |
| 24 | कु. पुजा रामेश्वर काकड | BA I | Kakad |
| 25 | कु. राणी नारायण चांभारे | BA I | R.N.Chambhare |
| 26 | कु. पायल संतोष तिडके | BA. I | P.S.Tidke |
| 27 | कु. मनिषा यशवंत हातोलकर | BA. I | M.Y.Hatolakar |
| 28 | कु. अंकिता धा. ठाकरे | BA III | Thakre |

P.I.R. Dist. Akola – Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College

| | | |
|---|---|---|
| (29) शांति जैस्वाल | BA III | Jaiswal |
| (30) अजय पांडे | B A III | [signature] |
| (31) निखिल भिंगारे | B A II | [signature] |
| (32) अक्षय सु. तायडे | B.A. II | [signature] |
| (33) पंकज वा. राठोड | B.A. III | P.Rathod |
| (34) शुभम म. गौंड | B.A. III | Gound |
| (35) सुरज दि. निलखन | B.A. III | Suraj |
| (36) अतुल रू. पवार | B.A. I | [signature] |
| (37) मुकेश सं राठोड | B.A. I | M.Rathod |
| (38) राजु प्रविण कळसकार | B.A. I | R.P. Kalaskar |
| (39) बादल केशव राठोड | B.A I | B.Rathod |
| (40) गणेश गजानन ठाकरे | B.A I | G.G. THAKRE |
| (41) आकाश शंकर धनगांव | B.A I | Dhangaon |
| (42) विक्की शंकरराव काकड | B.A I | Kakad |
| (43) जय प्रकाश ~~शंकर~~ आवत | B.A I | [signature] |
| (44) अंकुश रामेश्वर काकड | BA I | [signature] |
| (45) प्रविण रमेश शिंदे | BA II | P.R.Shinde |
| (46) प्रतिक्षा मधुकर ठाकरे | BA III | P.M. Thakare |
| (47) सारिका पुरुषोत्तम नांदोणगे | BA III | [signature] |



Dr. Rekha Kalbande madam (Librarian)
while offering garland to Annabhau Sathe

Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College
P. I.'R
Dist. Akola



On the dias - Principal Dr. V. C. Kharode, Dr. Rekha Kalbande & Prof. R. N. Gawande N.S.S. Program Officer.

Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College P. I. R Dist. Akola



Dr. V.C. Kharode, Principal addressing to the students.

Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College
P. I. R
Dist.Akola